१५८६

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. : १५८६

१५८६ आयाग
भा. भी


साहस कथा


सरदार धनाजीराव

१५८६ आषाढ़

भा - गी

कुमार रंजन माला क्र.–२

वाचनालय
बा.वा.
१५८६
३।५।८४

# सती कमलादेवी

( कुमारांसाठी कथा )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. १५८६ दि. ३।५।८४
विषय बा.वा. क्र. ..........

ना. स. करंदीकर

संजय
प्रकाशन, पुणे ४

१९७६

संजय प्रकाशन - अेकशे सहा

प्रकाशिका :

सौ. ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन
९१७/२२ फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे–४.

© ना. स. करंदीकर
४९८ नारायण पेठ,
पुणे–३०.

प्रथमावृत्ती : १ ऑगस्ट १९७६
लोकमान्य टिळक पुण्यतिथी शके १८९८

**मूल्य : तीन रुपये**

मुखपृष्ठ व प्रसग चित्रे } जोशी आर्टस्, पुण.

मुद्रक :

सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ,
पुणे २.

## आमच्या प्रकाशनाचे निवडक कुमार वाङ्मय

| | |
|---|---|
| **योगिनी जोगळेकर** | |
| मातृमेवा | ३–०० |
| गुरुशिष्य | ३–०० |
| तिळगूळ | ३–०० |
| खंडू खोडसाळे | ४–०० |
| **प्रभाकर अत्रे** | |
| जे श्रीहरीसाठी मेले | ४–०० |
| **अशोक देशपांडे** | |
| विजयंता भारत | ३–५० |
| भाग १ ते ४ | प्रत्येकी |
| **शं. रा. देवळे** | |
| दैव जाणिले कुणी | ४–०० |
| सरदार धनाजीराव | ३–०० |
| **ल. रा. गोडबोले** | |
| अपूर्व भेट | ३–०० |
| परेशचे पाताळातील पर्यटन | २–०० |
| **सौ. शैलजा राजे** | |
| सोन्याचा बूट | ३–०० |
| गुलाबकळी रुसली | ३–०० |
| **सौ. नलिनीबाई सहस्रबुद्धे** | |
| सूर्यफूल आणि इतर गोष्टी | |
| कारल्यातील माणिक | ३–०० |
| **भा. द. खेर** | |
| चक्रव्यूह | ४–०० |
| **सौ. तारा कुलकर्णी** | |
| पांगळा राघव | ३–०० |
| **सौ. मुक्ता केणेकर** | |
| मला फक्त एक बंदूक द्या | २–५० |
| पप्पांचा रेडिओ | ३–०० |
| **सौ. संजीवनी मराठे** | |
| लाडकी लेक | ३–०० |
| **पंढरीनाथ रेगे** | |
| मनोहर कथा | २–५० |
| **वि. के. फडके** | |
| सुलतानाचा न्याय | ३–०० |
| **मा. गो. काटकर** | |
| साहस कथा | २–५० |
| **केशव रा. फडणीस** | |
| देवदूत | ३–०० |
| **ना. स. करंदीकर** | |
| राणी रासमणी | ३–०० |
| **रमेश मुधोळकर** | |
| शामू सर्कसवाला | ४–०० |
| **वि. भा. नेमाडे** | |
| दुधाचा झरा | ५–०० |
| **न. दि. दुगल** | |
| एक होती सिंहीण | ४–०० |
| **सुधाकर प्रभु** | |
| वाढदिवसाची भेट | ४–०० |
| छोटा नटसम्राट | ४–०० |

**संजय प्रकाशन, पुणे ४.**


# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | सती कमलादेवी | ५ |
| २) | परिवर्तन | १२ |
| ३) | विश्वंभरबुवा | २४ |
| ४) | सुरजमल कोतवाल | २९ |
| ५) | लोभाचे फळ | ३४ |
| ६) | चिदंबरचा नंदनार | ३८ |
| ७) | नको तेव्हा आठवण | ४९ |
| ८) | तीन प्रश्न | ५५ |
| ९) | मला शिक्षा कां नाही केली | ६० |


—: ० :—

वाचनालय शाखा.
३५८६ ३५१८

# सती कमलादेवी



आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी वाटेल तो त्याग करण्याची भारतातील राजघराण्यांची परंपरा आहे. आपल्या प्राचीन इतिहासांत असे नृपतिश्रेष्ठ व नृपकन्या अनेक होऊन गेल्या; त्यांची नावे प्रात:स्मरणीय ठरली आहेत. राजा हरिश्चंद्र, राजा दिलीप, दाशरथी राजा प्रभु रामचंद्र आणि सूर्यवंशातील अनेक राजे-महाराण्या अशा होऊन गेल्या की त्यांनी आपल्या प्रजेच्या हितासाठी वाटेल ते कष्ट सोसले, त्याग केला आणि आपले ब्रीद राखले.

रजपूत राजे आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने शत्रूशी लढत आणि धारातीर्थी आपल्या देहाचे बलिदान झाल्यावर त्यांच्या राण्या व राजघराण्यातील इतर स्त्रिया जोहार करीत.

महाराणी पद्मिनीचे उदाहरण सर्वांना परिचित आहे. अशाच एका देशाच्या राजाची ही कथा. राजेमहाशयांचे नाव विजयसिंह. राजपुतान्यातील एका छोटया संस्थानचे हे राजे! एकदा त्यांच्या राज्यात अवर्षण झाले. दुष्काळ पडला. सुखासमाधानाने राहत असलेली प्रजा हैराण झाली. नद्या, तलाव, जलाशय, विहिरी, झरे सर्व आटले. पिके वाळून गेली. पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले, पिण्याचे पाणी मिळणे मुष्किल झाले; जनावरांचे हाल तर काय विचारू नका! जमिनीला भेगा पडल्या! सर्व राज्यात हाहाःकार उडाला!!

राजे विजयसिंह अस्वस्थ झाले. त्यांची झोप उडाली. सुखासमाधानात वावरणारे राजघराणे प्रजेच्या या हालांमुळे अत्यंत दु:खी–कष्टी झाले. देवळांतून अनुष्ठाने, प्रार्थना, अभिषेक सुरू झाले. पण वरुणराजाने अवकृपा केली. पावसाचा थेंब नाही. धरतीमाता होरपळून गेली. झाडांची पाने वाळून शुष्क झाली. पक्षी पटापट मरून पडू लागले–पशु-पक्षी हैराण होऊन सैरावैरा पाण्याच्या शोधार्थ हिंडू लागले. पण माणसे जाणार कोठे? भोवतालच्या प्रदेशातही सुबत्ता नव्हती. विजयसिंह राजे सचिंत आपल्या महालात बसले होते. काही उपाय सापडेना. सर्व योजना निष्फळ ठरल्या. त्यांची प्रिय राणी कमलादेवी आपल्या पतीची ही अवस्था पाहून दु:खी–कष्टी झाली.

राजाने तिच्यासाठी प्रासादाच्या परिसरांत सुंदर तलाव, पुष्करणी, कारंजी तयार केली होती. राणी नित्य या सरोवरांच्या काठी निवांतपणे बसे. पाण्यात विहार करणाऱ्या राजहंसाच्या जोडीकडे, विकसणाऱ्या कमलपुष्पाकडे, वायुलहरींबरोबर सरोवरात उमटणाऱ्या लाटांकडे पाहत असताना तिचे मन आनंद-

साम्राज्यात विहरू लागे. पण दुष्काळ पडल्यावर सरोवरांचे, पुष्करिणींचे पाणी आटले. तिचा आनंद आणि अंतरीचे समाधानही त्याबरोबर हरपले ! पण करणार काय ? हे संकट सर्व प्रजाजनांवर आले होते आणि आता कसोटीची वेळ येऊन ठेपली होती.

राजाने सर्व प्रजाजनांना बोलावून दरबार भरवला आणि उपाययोजना काय करावी याबद्दल चर्चा केली. सर्वांचा विचार घेऊन एक मोठा तलाव खोदण्याचे काम सुरू करावे असे ठरले. त्यासाठी प्रत्येक सुदृढ जाणत्या नागरिकाने श्रम करून रात्रंदिवस झटून हे खोदकाम करायचे असे ठरले. प्रधानमंत्री व स्वतः राजा विजयसिंह सर्वांनी श्रमदान करून हा तलाव खोल खोल पाणी लागेपर्यंत खणायचा असे ठरले. कामास शुभमुहूर्तावर देवाची प्रार्थना करून सुरुवात झाली. हां हां म्हणता तलावाचे काम सुरू होऊन खोली वाढू लागली. सतत काम सुरू झाले. तलाव दहा, पंधरा, वीस, तीस, चाळीस फूट खोल खाली गेला; तरी पाणी लागेना. सर्वांची निराशा झाली.

त्या रात्री राणी कमलादेवीला एक स्वप्न पडले. स्वप्नात साक्षात् जलदेवता आली आणि सांगू लागली. 'कमलादेवी, तुझी स्वतःची पूजा मला हवी आहे. सर्व पूजा-साहित्यांनी तू रोज तलावाच्या तळाशी येत जा. एकटीच; तुला मी प्रसन्न झाले आहे; पण तू तिथून जाता कामा नये.' राणीने हे स्वप्न विजयसिंह महाराजांना सांगितले. ह्या स्वप्नाला काही अर्थ आहे यावर श्रद्धा ठेवून राजाने दरबार भरवला. काम पुन्हा सुरू केले. रोजचे खोदकाम संपण्याच्या वेळेस राणी स्वतः सर्व पूजा–साहित्य घेऊन एकटी तळाशी येई व यथासांग पूजा करी. असे आठ–दहा दिवस

गेले तरी पाणी येण्याचे चिन्ह दिसेना. मग राणीने प्रार्थना केली, ' हे जलदेवते ! तू संतुष्ट हो. आम्हा सर्वांवर आलेले संकट दूर कर. तू प्रगट होईपर्यंत मी येथून हलणार नाही.'... दिवस माव-ळला. रात्र झाली. तरी राणी तिथून हलेना. सर्व प्रजाननांनी तिला वर येण्यास सांगितले व पुन्हा खोदकाम करण्याचे ठरले. कमलादेवींचा निश्चय पक्का होता. मध्यरात्र झाली. राजानेही मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. रात्र संपत आली. मग पहाटेच्या वेळी एका कोपऱ्यातून जलप्रवाह सुरू झालेला दिसला. राणीने ते पाहिले मात्र ! तिचा आनंद गगनात मावेना. तिने पूजा केली आणि मग ती वर आली...पण—

पण काय दुसऱ्या दिवशी पाहतात तो पुन्हा पाणी आटलेले ! झरा लुप्त झालेला; प्रवाह बंद पडलेला !! कमलादेवीने पुन्हा त्या रात्री पूजा केली आणि ती जलदेवतेला प्रार्थना करून म्हणू लागली, ' देवते तू प्रसन्न हो. तू येथे स्थिर हो. त्याशिवाय मी येथून हलणार नाही.' मग पाणी दिसू लागले. एकदम पाण्याचे कारंजे सुरू झाले. आता पाण्याचा स्फटिकासारखा शुभ्र प्रवाह सुरू झाला. पाणी राणीच्या पायाला लागू लागले. हे दृश्य वरच्या काठावरून हजारो नागरिक आणि राजे विजयसिंह पाहत होते. तळाशी एकटी राणी पूजापात्र घेऊन उभी होती. तिला सर्वजण वर बोलावू लागले. तिने वरती येण्याचा प्रयत्न करताच पाण्याचा प्रवाह ओसरू लागला. मग ती पुन्हा तळाशी गेली—पुन्हा पाणी येऊ लागले—राणीची पावले बुडाली. पाणी वर वर येऊ लाग-लेले पाहताच राजाने तिला काठावरून हाक मारून वर येण्यास सुचविले—म्हणाला,

' देवी तुला प्रसन्न झाली. तू भाग्यवान ! दिले देवीने तुला

वरदान ! चल आता बाहेर ये. माझे प्राण तुझ्यावीण कासावीस झाले ! पाणी कुठपर्यंत आले – सांग.'

कमलादेवीने खालूनच उत्तर दिले –

' देवी मला बोलावते आहे – 'जाऊ नको ग – मला तू हवीस' असे म्हणते आहे. पाणी वर वर येत आहे. माझे पाय बुडाले घोटचापर्यंत – कमरेपर्यंत – पाणी आले.'

राजाचे प्राण कासावीस झाले – तो म्हणाला,

' कमले, वर ये वर ये; मला तू हवीस. प्रजाजनांना राणी हवी. राजाला पत्नी हवी. हे सिंहासन – माझे हृदयसिंहासन तुझ्याशिवाय सुने सुने आहे ! ये. ये वर ये. धोका वाढतो आहे ना ?' राणी कमलादेवीने उत्तर दिले – 'होय, पाणी कमरेपर्यंत आले. मी वर आले की पाणी ओसरणार. तलाव कोरडा होणार पाणी नाही मिळणार–प्रजाजन होरपळून तडफडणार – हे पहा मी वर येऊ लागताच पाणी ओसरू लागते – पुन्हा तळाशी जाताच वाढू लागते – आता मी नाही येथून हलणार !'

राजा पाहतो तो राणी पाण्यांत कमरेपर्यंत बुडालेली ! पाणी वर वर येऊ लागले. इकडे प्रत्यक्ष हृदयस्वामिनी प्राणप्रिय, पत्नी बुडण्याच्या धोक्यात असलेली म्हणून दुःखाश्रूंच्या धारा !

राजाने, तळमळून, कळवळून हृदय पिळवटून हाका मारण्यास सुरुवात केली – ' वर ये – आपले प्राण वाचव.' प्रजाजनांनी आणि राजाने तळाशी जाऊ नये अशी जलदेवतेची सक्त ताकीद ! खाली तळाशी जाण्याची कोणाची हिंमत नव्हती आणि झाली असती तरी राणीला जबरदस्तीने आणण्याचे सामर्थ्य कोणातच नव्हते. राजा हवालदिल झाला. ' पाणी कुठपर्यंत आले. सांग ना, वर ये ना ?' अशी काकुळती करू लागला.

पण आता कमलाराणीचा निश्चय पक्का होता. ती तिथून हालेना. जलदेवता तिला जाऊ नको म्हणून सांगत होती. पाणी गळ्यापर्यंत आले. तिने फुले वाहिली आणि प्रार्थना केली–

' हे जलदेवते, तू येथे कायमची राहा. या तलावातील पाणी कधी कमी होऊ नये. तलाव तुडुंब भरभरून वाहू दे. आमच्या राज्यातील विहिरी–ओढे, नाले, नद्या पाण्यांनी सदैव समृद्ध होऊ देत. ' देवी प्रसन्न होऊन डोलू लागलेली दिसली. ' नमो देव्यै महादेव्यै – नमस्ते जलशालिनी.'

आता जलदेवता प्रसन्न जाली. कमलादेवीने वर येऊन आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न केला नाही. तिला उत्तम पोहता येत होते. पण प्रजाजनांच्या कल्याणाची तळमळ तिला होती. तलावातील पाणी वर वर येऊ लागले. राणीने हात जोडले. पाणी तिच्या डोक्यापर्यंत आले. त्या जलाशयात तशीच उभी राहिली. हाती पूजापात्र तसेच होते. तिने आपल्या जिवाचे बलिदान केले. ' राणी दिसेनाशी झाली. तलाव भरभरून वाहू लागला. इकडे सभोवतालच्या विहिरी–ओढे नाले भरभरून वाहू लागले. सर्व प्रजाजन संतुष्ट झाले. राजालाही प्रजेवरचे संकट टळले म्हणून आनंद झाला, पण त्यासाठी आपल्या प्राणप्रिय पत्नीला जलसमाधी घ्यावी लागली याचे दुःखही झाले. प्रजेच्या कल्याणासाठी असे प्राणार्पणही करावे लागते. तो आदर्श कमलादेवीने घालून दिला !

राजा विजयसिंहाने पुन्हा लग्न केले नाही. तो कमलादेवीची प्रतिमा सतत जवळ ठेवी. पण राज्याचा कारभार चालू ठेवणे हेही कर्तव्य होते. आपले कामकाज आटोपल्यावर तो रोज तलावाच्या काठी जायचा. सुंदर गुलाबाची फुले जलदेवतेला आणि

प्राणार्पण केलेल्या पत्नीला वाहून म्हणायचा–

'प्रिये–वर ये ना ? केव्हा येणार ? आता पाणी भरपूर झाले ना ? जलदेवता नाही रागावयाची. ये– वर ये. हा तुझा प्रियकर तुझ्या भेटीसाठी तळमळतो आहे–' मग पाण्यातून बुडबुडे निघू लागत. व त्यांतून राजाला अस्पष्ट ध्वनी ऐकू येऊ लागे.

'प्राणप्रिया, माझी पूजा अजून संपली नाही. मी येते हो, पूजा आटोपली म्हणजे. माझी काळजी करू नका, मी सुखी आहे. तुम्ही पण सुखात राहा. प्रजेला जपा.'

धन्य ती महाराणी कमलादेवी ! !

□ □

२

# परिवर्तन

थोरामोठ्यांच्या, संत–महंतांच्या सान्निध्यात राहिले म्हणजे जीवनाला केव्हा ना केव्हा तरी कलाटणी मिळते आणि आपले सर्व जीवन मोहरून जाते. सद्‌गुरु कृपावंत होऊन आपल्या शिष्याला दिव्य स्पर्शानेही कृतार्थ करतात. तो जो क्षण तोच दिव्य क्षण. तो ज्यांना लाभला ते भाग्यवान.

स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, श्री अरविंद, स्वामी दयानंद, यांची चरित्रे पाहा. शाहीर सगनभाऊ, दासगणू यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली ती अशीच. एखाद्या सज्जनाच्या उपदेशाने, बोधवाक्याने, कृपाकटाक्षाने. महंमद इक्बाल हा विख्यात उर्दू कवी. त्याच्या जीवनाला कलाटणी मिळाली ती हरदयाळ यांच्या एका वाक्याने. ती सर्वच कथा मोठी मनोरंजक व उद्‌बोधक आहे !

लाहोरचे फोरमन् ख्रिश्चन कॉलेज हे लाहोरचे एक भूषण होते. या कॉलेजात शिकून सुविख्यात झालेले अनेक देशभक्त, संत,

महात्मे आहेत. स्वामी रामतीर्थांनी याच कॉलेजात अध्ययन व नंतर अध्यापन केले. स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद यांनी या कॉलेजला भेट दिली. व विद्यार्थ्यांपुढे आपले विचार मांडले, ते विचार ऐकून ज्याच्या जीवनाला चैतन्य लाभले असे अनेक महा-पुरुष झाले. या कॉलेजची परंपराच तशी होती. प्रिन्सिपॉल म्हणून युरोपियन अधिकारी असले तरी ते शिक्षणप्रेमी, विद्यार्थीप्रिय असत त्यांनी विद्यादानाचे कार्य प्रामाणिकपणे केले.

लाहोरच्या कॉलेजात एके दिवशी एका महाराष्ट्रीय विद्वान पंडिताने आपल्या स्मरणशक्तीचे प्रयोग करून सर्वांना थक्क करून सोडले. अष्टावधानी चतुर माणसे कशी असतात याचे हे प्रात्य-क्षिकच होते. कुरुंदवाडचे वे. शा. सं. यडुरकर शास्त्री यांचे पाठां-तर ऐकून राष्ट्राध्यक्षही थक्क झाले. ही परमेश्वरी देणगीच असली पाहिजे. त्या दिवशी लाहोर कॉलेजातील हे स्मरणशक्तीचे अचाट पयोग पाहून जो तो प्रशंसोद्गार काढून त्या पंडिताचा गुणगौरव करू लागला. त्यात कॉलेजचे प्रिन्सिपॉल व प्राध्यापकही होते.

प्रयोग संपल्यावर प्रत्येकजण त्या पंडिताला भेटू लागला. इतक्यात व्यासपीठावर एक विद्यार्थी चढला आणि सर्वांना उद्देशून म्हणू लागला, ' हे प्रयोग काही इतके अचाट, अवघड नाहीत, मी सुद्धा असे प्रयोग करून दाखवेन.' या धाडसी विद्यार्थ्याचे नाव होते हरदयाळ. तो ख्रिश्चन कॉलेजचा एम्. ए. चा विद्यार्थी होता.

हरदयाळाचे हे भाषण ऐकताच, सर्व विद्यार्थ्यांनी त्याच्याभोवती एकच गिल्ला केला. ' महाशय, बोलणे सोपे आहे. करून दाखवता का असे प्रयोग ? प्रत्यक्ष काही करून पटविलेत तर विश्वास बसेल

नाही तर फजिती करून घ्याल झालं ?'

पैज ठरली. कॉलेजात हरदयाळांनी स्मरणशक्तीचे प्रयोग करून दाखवण्याचे कबूल केले. दिवस ठरला. कॉलेजचे सर्व विद्यार्थी मोठ्या उत्सुकतेने पण हुर्रेवडी करण्यासाठीच जमले होते. प्रयोग फसला तर हरदयाळांच्या फजीतीला पारावार नव्हता. कॉलेजच्या सभागृहात सर्व विद्यार्थी जमा झाले. हरदयाळ आत्मविश्वासाने स्टेजवर उभे होते; एखाद्या धीरोदात्त पुरुषाप्रमाणे. त्यांनी चौफेर नजर फिरविली आणि आव्हान केले. घ्या परीक्षा, करा सुरुवात.

एका विद्यार्थ्याने विचारले, ' शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकातील दुसऱ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशातील पात्राचे भाषण म्हणून दाखवा...' हरदयाळने ते भाषण अस्खलितपणे म्हणून दाखविले !

दुसऱ्याने प्रश्न केला, 'टेनिसन् कवीच्या ' इन् मेमोरियम् ' या काव्यातील ४२ व्या ओळीपासून सुरुवात करून उलट पहिल्या ओळीपर्यंतचे काव्य म्हणून दाखवाल का ?'

हरदयाळने पाठ म्हणून दाखविले अगदी सांगितल्याप्रमाणे.

इतक्यात एका विद्यार्थ्याने कॉलेजची मोठी घंटा वाजवण्यास सुरुवात केली. ठराविक ठोके दिले. घड्याळातील ठोके ठण् ठण् वाजतात त्याप्रमाणे ठोके येऊ लागले. त्याच वेळी एका विद्यार्थ्याने फळ्यावर एक कूट गणित-प्रमेय सोडवण्यासाठी लिहून ठेवले. एक विद्यार्थी गीतेतील संस्कृत श्लोक पठण करू लागला. मधूनच एकाने लॅटिन काव्य, एकाने ग्रीक काव्यरचना म्हणण्यास सुरुवात केली ! एकीकडे बुद्धिबळाचा डाव सुरू होता.

हरदयाळने संस्कृत, ग्रीक, लॅटिक काव्ये पुन्हा तशी म्हणून दाखविली, फळ्यावरचे गणित सोडविले, घंटेचे ठोके किती पडले हे सांगितले, एकीकडे बुद्धिबळाचा डाव चालला होता तोही खेळत

खेळत मात केली ! !

सर्व विद्यार्थी अवाक् झाले, अष्टावधानी हरदयाळ सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला. त्याच्यावर अभिनंदनांचा वर्षाव होऊ लागला. कित्येकांनी त्याला बक्षिसे दिली. मेजवानी देऊ केली.

प्रयोग संपला. हरदयाळने पैज जिंकली. तो प्रयोगानंतर आपल्या वसतिगृहाकडे चालला; थोडे अंतर चालून जातो न जातो तोच त्याच्यासमोर एक विद्यार्थी हात जोडून सामोरा आला व म्हणाला 'हरदयाळजी, मी आतापर्यंत तुमच्या हुशारीबद्दल अनेकांच्या तोंडून स्तुतिस्तोत्रे ऐकत होतो, पण आजचे तुमचे प्रयोग प्रत्यक्ष पाहून मी थक्क झालो ! इतकी अचाट बुद्धिमत्ता आणि स्मरण-शक्ती तुम्ही कशी मिळवलीत ?

'मित्रा, तुझे नाव तर सांगशील ?' हरदयाळने प्रश्न केला.

'माझे नांव महमद इक्बाल, मी या कॉलेजात प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे.'

'ओ हो, तू इक्बाल काय ? तुझ्या कविता मी कॉलेज मासिकां-तून वाचतो किती सुंदर कल्पना असतात त्यात ?'

इक्बालच्या अंगावर मूठभर मांस चढले.

'मित्रा, तुझ्या कवितेचा विषय प्रेम– तो जरा बदलशील का ? जरा उदात्त मन कर. तुझ्या उत्कट प्रेमकाव्यांना देशभक्तीची आणि देशप्रेमाची जोड देशील का ?'

'तुमच्या या सूचनेचा मी जरूर विचार करीन बरं.' असे आश्वासन देऊन त्यांना लवून आदराने नमस्कार करून महंमद तिथून निघून गेला.

जीवनाला कलाटणी मिळविण्याचा तो क्षण. त्याला पूरक अशी एक घटना घडली– त्याच दिवशी रात्री.

वसतिगृहातील आपल्या खोलीत हरदयाळ झोपले होते. रात्रीचा ११ चा सुमार होता. सर्वत्र सामसूम होते. इतक्यात दरवाजावर टिक् टिक् ऐकू आली. हरदयाळ जागे झाले. 'कोण असेल बरं या वेळी ?' असं मनाशी विचारत त्यांनी प्रश्न केला.

'कोण आहे ?'

'तुम्हाला या वेळी उठवतो– क्षमा करा. कृपा करून एक क्षणभर दार उघडाल का ?'

दार उघडले आणि पाहतात तो महमद इक्बाल पुढे उभा !

'ये, आत ये. अशा अवेळी काय काम निघाले बाबा ?'

'माझी एक नम्र विनंती आहे. ऐकाल का ?'

'अरे, पण काय ती सांगशील तर आधी ?'

'सांगायला लाज वाटते. सांगू तरी कसे ?'

'काय, झालं तरी काय असं लाज वाटण्यासारखं ?'

'कसं ? माझ्या हातून एक अतिशय निंद्य कृत्य घडले. कलंक लागेल असे. आज रात्रीच.'

'ठीक. सांग मोकळेपणे. मी वाच्यता करणार नाही. काय ते स्पष्ट सांग– काहीही लपवून न ठेवता.'

'प्रिय मित्रा, या अशा अवेळी तुझी झोपमोड करून त्रास देतो याची क्षमा कर. मी जी हकीगत सांगणार आहे ती अतिशय घृणास्पद निंद्य आहे. तुमच्या कालच्या सूचनेचा माझ्यावर विलक्षण परिणाम झाला. माझ्या हातून एक घोर अपराध घडला. तो सर्व सांगणार आहे.'

माझा अधःपात झाला आहे– कृपा करून अभय वचन देऊन माझ्यासारख्या पतिताला काही आशा दाखवाल का ?'

हरदयाळनी त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याला शांत केले.

जवळ बसवून घेतले आणि म्हणाले, ' मित्रा, धीर धर. सांग काय झाले ते मोकळेपणे. ' इक्बालने आपले तोंड झाकून घेतले होते पण या आश्वासनाने धीर येऊन तो बोलू लागला.

' मला नृत्यगायनाची विलक्षण आवड, तो शोक पुरा करण्यासाठी मी रोज गगनबावडीकडे एका नर्तिकेच्या घरी जात असतो. हमीदा नावाच्या एका सुंदर तरुण नर्तिकेवर माझे प्राणपलीकडे प्रेम आहे. ती नृत्य करते आणि तिचा गळाही कोमल सुंदर आहे. ती गाणेही मधुर गाते. ऐकताना भान हरपून जावे असे. मी तिच्यावर पूर्ण भाळलो. मला तिच्याकडे जाण्याचे व्यसन जडले. नित्याप्रमाणे काल रात्री मी तिच्याकडे गेलो. मला तिच्या प्रेमाची परीक्षा पाहायची होती. मी तिला माझ्या मागोमाग बाहेर चल म्हणून सांगितले. तिने नकार दिला. माझा राग अनावर झाला. ' काय, माझेही ऐकत नाहीस ? ' मी तिला रागाने तडातड बोलू लागलो, पण ती माझे म्हणणे ऐकेना. थोड्या वेळाने तिनेच उपरोधिकपणे मला सुनावले, ' जरा आरशात पाहा. काय पण मुखडा ? आपली छबी कशी दिसते ते पाहा एकदा. ' असे म्हणून तिने माझ्यावर जळजळीत दृष्टी रोखली आणि तुच्छतेने माझा धिक्कार केला... ' अस्सं काय ? माझ्या अंगाचा तिळपापड झाला. हातात सुरी होती. क्षणाचाही विलंब न करता मी सुरी तिच्या छातीत खुपसली. आणि देखता देखता ती खाली कोसळली. गतप्राण झाली ! मी हतबुद्ध झालो. काय करावे ते सुचेना. मला यातून सुटण्याचा काही मार्ग दाखवा. पोलीस तपास करीत येतील गुन्हा उघडकीला येईल. पोलिस कदाचित इथेच येतील आत्ता. '

' इक्बाल, अरे काय केलंस हे ! इतका अविचार ! ' हरदयाळांच्या तोंडून उद्‌गार निघाले आणि एक क्षणभर ते डोळे मिटून

स्वस्थ बसले. काही उपाय ते शोधीत असावेत असे वाटले. क्षणभराने ते म्हणाले, ' इक्बाल, आताच्या आता या क्षणी मी सांगेन ते करशील का ?'

' महाराज, माझ्या हातून घोडचूक झाली त्याचा पश्चात्ताप होतो मला. मी हतबुद्ध झालो आहे. तुम्ही सांगाल ते करीन. '

तू आत्ताच्या आत्ता प्रिन्सिपॉल साहेबांचे बंगल्यावर जा. ही सर्व हकीगत खरी– जशी घडली तशी– त्यांना सांग आणि हात जोडून शेवटी विनवणी कर, ' साहेब, तुम्हीच काय ते मला यातून वाचवाल ? फाशीवर जाण्याचे संकट ओढवले आहे. मला वाचवा. '

इक्बाल तिथून निघाला आणि थेट प्रिन्सिपॉल हेमींच्या बंगल्यावर जाऊन पोचला. ' साहेब झोपले का ?' त्याने रखवालदाराला विचारले, ' साहेब झोपले नाहीत पण आता कुणालाही भेटणार नाहीत. ' रखवालदाराने उत्तर दिले.

इक्बालने एक चिठ्ठी त्याच्या हाती दिली आणि सांगितले, ' ही चिठ्ठी तेवढी साहेबांना नेऊन दे. चिठ्ठी वाचली म्हणजे साहेब आपण होऊन मला बोलावतील. ' चिठ्ठीत लिहिले होते, ' क्षमा करा, या वेळी मी तुम्हाला त्रास देतो आहे. कृपया फक्त दोन मिनिटे मला बोलवा. ' इक्बाल.

प्रिन्सिपॉल साहेबांनी त्याला आत बोलावले आणि विचारले, ' तू इक्बाल, पहिल्या वर्षाचा विद्यार्थी ना ? का आला आहेस ? काय काम आहे अशा वेळी ?'

इक्बालच्या डोळ्यांत अश्रू तरंगू लागले. खाली मान घालून तो तसाच उभा होता. ' अरे बोल ना ? तोंड उघड. सांग कशाला आला आहेस ?'

'सर, इथं कोणी नाही ना दुसरं? मी काल रात्री वेश्यागृहाकडे गेलो होतो, गगनबावडीला.'

'वेश्यागृह– कुठं आहे ते?' प्रिन्सिपॉल साहेबांनी विचारले. मग इक्बालने झालेली सर्व हकीगत सांगितली. पश्चात्ताप व्यक्त केला, मला वाचवा म्हणून प्रिन्सिपॉलसाहेबांचे पाय धरले. 'तुमच्याशिवाय मला या जगात कोणी वाचवणार नाही.' अशी काकुळतीने मनधरणी केली.

'इक्बाल अरे, हे काय अघोर कृत्य केलंस तू! आता यातून कसा मार्ग निघणार?'

क्षणभर प्रिन्सिपॉल हेमी साहेब स्वस्थ बसले. ते कसला तरी विचार करीत होते. क्षणभराने ते म्हणाले, 'ठीक आहे इक्बाल, तू आपल्या खोलीवर जा. मला काय करायचं ते मी करतो. तू एक कर. तोंडाला कुलूप घाल. कोठे एक ब्र ही बोलू नको. मग तो कोणीही असो. कोणाजवळ एक अवाक्षरही काढणार नाही असे वचन देशील का?'

'होय साहेब, वचन देतो कोणाजवळ काही बोलणार नाही.'

'मग जा बरं, खोलीवर जाऊन झोप. पुन्हा सांगतो. गप्प बैस. अवाक्षरही बोलू नको! जा आता!'

इक्बाल तिथून निघून गेल्यावर प्रिन्सिपॉल साहेबांनी रखवालदाराला बजावले, 'आता कोणालाही आत सोडू नको. मी कोणालाही भेटू शकणार नाही.'

अर्ध्या तासाने पोलीस सुपरिंटेंडेंट अलमखान प्रिन्सिपॉल साहेबांच्या बंगल्यावर आला. रखवालदाराने सांगितले. 'साहेब झोपले आहेत. गाठ पडणार नाही. गाठ घ्यायची असेल तर उद्या

सकाळी दहाच्या पुढे या. आता काही झाले तरी ते उठून भेटू शकणार नाहीत ?'

युरोपियन प्रिन्सिपॉल साहेबाला झोपेतून उठवण्याचे धाडस पोलीस सुपरिंटेंडेंटलाही झाले नाही.

सुपरिंटेंडेंट अलमखान परत गेला. त्याची निराशा झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी अलमखान साहेबांना भेटायला आला.

' तुमच्याशी थोडे काम आहे साहेब, म्हणून त्रास देतो आहे क्षमा करा. तुमच्या कॉलेजात पहिल्या वर्गात महमद इक्बाल हा विद्यार्थी आहे ?'

' कोण इक्बाल ? पहिल्या वर्षाचा विद्यार्थी. हं. हं. तो कवी होय ? आहे खरं त्या नावाचा एक विद्यार्थी आमच्या कॉलेजात. बरं मग; त्याला काही झालं की काय ?'

' काल रात्री एक खून झाला आहे. वेश्यागृहात गगनबावडी विभागात. त्यासंबंधी त्या विद्यार्थ्याची आम्हाला चौकशी करायची आहे. '

' खून किती वाजता झाला ?'

' बरोबर नऊ वाजता. '

' नऊ वाजता ? त्या वेळी आमच्या वसतिगृहात रोल कॉल घेतला जातो. त्यावेळी तर इक्बाल कॉलेज वसतिगृहात हजर होता. त्याची हजेरी मी स्वतः मांडलेली पाहिली आहे. मग तो त्या वेश्यागृहात कसा असेल ? एकच व्यक्ती दोन्ही ठिकाणी एकाच वेळी...? तुमची काही तरी गैरसमजूत झालेली आहे. आमची नोंद चुकणार नाही. त्याला विचारता कशाला ? त्याचा उपयोग काय ? तो तिथं नव्हताच तर ! जा तुम्ही, उगीच तुमचा व माझा वेळ जायला नको. चला मलाही कामावर जायचं आहे.'

बिचारा पोलीस सुपरिंटेन्डेन्ट. या इंग्लिश साहेबापुढे काय धाक दाखवणार ? विश्वास न ठेवावा तरी पंचाईत. ब्रिटिश सरकारचा गोरा अधिकारी पडला. बोलणार काय ? हा आला तसा हात हालवीत पोलीस अधिकारी निमूटपणे तिथून निघून गेला. पुढे महमद इक्बाल खुनी म्हणून कोणाला पकडून नेले, कोणाला त्याच्या नावावर फाशी दिले हे एक देव जाणे !

त्या दिवशी सायंकाळी इक्बाल हरदयाळना भेटला. कृतज्ञता दर्शविण्यासाठी मान खाली घालून उभा राहिला. तोंडून शब्द फुटेना. तो धसमसून रडू लागला. त्याने हरदयाळाचे पाय धरले. तो वर उठेच ना.

हरदयाळनी विचारले, 'अरे काय झालं ?'

काही वेळाने मान वर करून इक्बालने उत्तर दिले, 'तुमच्या सूचनेप्रमाणे मी प्रिन्सिपॉल साहेबांना भेटलो. घडलेली सर्व हकीगत सांगितली. त्यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले– संकट टळले. तुमचा मी ऋणी आहे.'

'माझा ? ते रे कशाबद्दल ?'

'तुम्ही मला वाचवलंत.'

'अरे, मी तर काहीच केलं नाही. फक्त सूचना दिली, तू काय करावंस त्याची.'

'छे छे. असं कसं म्हणता ? तुमच्या सूचनेप्रमाणे मी वागलो म्हणून वाचलो. तुम्हीच माझे प्राणदाते.'

'ठीक. तर इक्बाल तू वाचलास. देवाची कृपा, तुला पूर्ण पश्चात्ताप झाला– तू शुद्ध झालास. तुला मी मागे सूचना केली होती

ती आठवते ना ? तुझ्या प्रेमकाव्याचा विषय प्रियकर– प्रेयसी– न करता मातृभूमी ही देवता आणि मातृभक्त हा तिचा सुपुत्र ही भावना सतत उराशी बाळगून तू देशभक्तीने ओथंबलेली स्वातंत्र्य-गीते रचून तयार कर आणि गोड आवाजात ती म्हणत जा.

मी तुला कल्पना सुचवितो– हा भारत देश हे सृष्टीदेवतेचे निसर्गरम्य उद्यान– त्यात राहणारे भारतवासी हे त्या रमणीय उद्यानात विहरणारे पक्षी–कोकिळा– भारद्वाज ! ! लाग त्या उद्योगाला. तुझ्या अंगी रचना-कौशल्य आहे! वाग्देवता तुला प्रसन्न आहे. स्फूर्तीची कारंजी कोमल मधुर काव्यातून थयथया नाचू लागतील–

त्याच क्षणी महंमद इक्बालचे हृदय प्रसन्न झाले. त्याने डोळे मिटले, हात जोडले आणि म्हणाला, 'हरदयाळजी, तुमचा वरद-हस्त मस्तकी ठेवा. हा तुमचा भक्त यापुढे तुमच्या सूचनेप्रमाणे वागत असलेला दिसेल. इष्काच्या प्रेमाला हपापलेला, वासनांनी लपेटलेला, वैषयिक प्रेमाने मुग्ध झालेला इक्बाल दग्ध झाला. त्यातून नवा जन्म घेऊन येईल तोच खरा इक्बाल.'

तीन–चार दिवसांनी इक्बाल हरदयाळांच्या खोलीवर आला आणि म्हणाला, 'हरदयाळजी, माझी कविता जरा ऐकता–? काव्याचे बोल इक्बालच्या हृदयातून स्रवू लागले–

'सारे जहाँसे अच्छा, हिंदुस्थाँ हमारा !'

...या काव्याने सारा भारत देशप्रेमाने उचंबळून आला. स्वातंत्र्य-गीतात या गीताचे स्थान अढळ झाले !

महमद इक्बाल यांची राष्ट्रीय कवींत गणना झाली. उच्च शिक्षणासाठी ते विलायतेस गेले.

मानवी मनाच्या अस्मितेचे सुरम्य चित्र रेखाटून त्यांनी पुढेपुढे चालण्याचा संदेश दिला आहे-

सितारोंके आगे जहाँ और भी है ।
अभी इश्कमे इम्तिहां और भी है ।।
नहीं जिंदगीमें नहीं ये मिजाये ।
यहा सैंकडो कारवाँ और भी है ।।
किआयत न कर आलमे रंगीनुपर ।
चमन और भी आशियाँ और भी है ।।

परिवर्तन पूर्ण झाले. बेसूर बासरीला नव माधुर्याची दिव्यता लाभली. मग जे जे घडले ते भव्य, उत्कृष्ट, उत्स्फूर्त राष्ट्रभक्तीने तेजाळलेले– ! !

□ □

३

# विश्वंभरबुवा



या जगात पडद्याआड राहून सतत परोपकार करणारी, दया दाखवणारी, करुणा बाळगणारी साधु-संत मंडळी काही थोडी-थोडकी नाहीत. ईश्वरनिष्ठांची मालिका सतत चालू आहे. या पुण्यात्म्यांच्या पुण्याईनेच जग चालते, टिकून राहते अशी काहींची श्रद्धा आहे ती वावगी कोण म्हणेल ?

प्राचीनकाळची ही एक सत्यकथा पाहा.

पूर्वी विश्वंभरबुवा या नावाचे एक संन्यासी एका नदीकिनारी जंगलात राहत असत. आपल्या निर्वाहाचा बोजा कोणावरही न

पाडता ते कष्ट करून मिळवत आणि सर्वांवर प्रेम करीत. दया, क्षमा, शांती या सद्‌गुणांचे ते मूर्तिमंत प्रतीक होते. तपश्चर्येने त्यांच्या मुखमंडलावर नित्य तेज दिसे. हातात मृगाजिन, कमंडलू, कटोरा घेऊन ते निघाले की त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने दिशा उजळून, आनंदाच्या लहरी उठत. ज्यांच्यावर दृष्टी जाईल ते धन्यता मानत. अशी काय विलक्षण जादू होती त्यांच्या वागण्या-बोलण्यात ? त्यांच्या जीवनाचे रहस्य फक्त दोन शब्दांत सामाव-लेले होते. ते नित्य देत गेले त्यांचा हात सदा दानासाठी परोप-कारासाठी आणि क्षमा करण्यासाठी. पण आपल्या कृतीचा उच्चार त्यांनी मुखावाटे कधी केल्याचे आठवत नाही. त्यांचे स्मितवदन, त्यांचा प्रेमळपणा, सहनशीलता आणि दातृत्व यात त्यांचे व्यक्ति-मत्त्व प्रगट होई.

त्यांची कीर्ती भगवान शंकरापर्यंत जाऊन पोहोचली. शंकराने दोन देवदूत या महात्म्याची परीक्षा घेण्यासाठी पाठविले. दोन्ही देवदूतांनी गुप्त हेराप्रमाणे विश्वंभरबुवांचे रोजचे जीवन, वागणे, बोलणे, आचारविचार आणि कृती यांचे अगदी बारकाईने निरीक्षण केले. त्यांना शोध घेऊनही चुकूनसुद्धा काही वैगुण्य आढळले नाही. दैवी सद्‌गुणांचा हा पुतळा पाहून ते थक्क झाले. भगवान शंकराकडे जाऊन त्यांनी आपला अहवाल सादर केला आणि विनंती केली, ‘ भगवान, या संतमहात्म्याला आता चमत्कार करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून द्यावे. ’

शंकर म्हणाले, ‘ तथास्तु ! जा जाऊन विचारा त्याला. कोणती सिद्धी त्याला हवी आहे ती. ’

देवदूत विश्वंभरबुवाकडे येऊन विचारू लागले, ‘ बुवा, रोगी, आपद्‌ग्रस्तांना तुमचा स्पर्श झाल्याबरोबर बरे वाटावे, दिलासा

मिळावा अशी सिद्धी तुम्हाला हवी का ?'

'छे : ! नको महाराज; ही किमया त्या भगवंताची. त्याचे हे काम.' – बुवांनी उत्तर दिले.

'बरं तर; पापी दुष्कृत्ये करणाऱ्यांना सन्मार्गावर आणण्याचे सामर्थ्य तुमच्या अंगी प्राप्त व्हावे असा वर हवा का ?' – देवदूतांनी विचारले.

'नको हे काम प्रेषितांचे, देवदूतांचे. मला हा वर नको.'

'मग सहनशक्तीचा व क्षमेचा पुतळा बनून तुमच्या गुणांच्या तेजाने लोकांनी तुमच्याकडे आकर्षित व्हावे अशी काही जडीबुटी हवी का ?

'नको; बाबांनो, लोक माझ्याकडे येऊ लागले तर परमेश्वराला; त्याचे भजन, पूजन, गुणगान करण्याचे सोडून देऊन. माझ्याभोवती पिंगा घालतील.'

'मग बुवा तुम्हाला हवं तरी काय ?'

'मी तुम्हाला काही हवं आहे असं म्हटलं कधी ?'

'पण बुवा, तुम्ही काही तरी सिद्धी मागितलीच पाहिजे, –नाही तर तुमच्यावर ती आम्ही लादू.'

'ठीक. मजवर ईश्वराची सतत कृपा असावी. त्या आधारावर मला सर्व काही लाभले, काही साधले असे होणार नाही का ?'

'हे काय मागणे झाले ? अहो बुवा, तुमच्यावर ईश्वराची कृपादृष्टी सतत आहेच. आम्ही सांगतो काय नाही आहे ते मागा.'

'बाबांनो, का असे माझ्या मागे लागला ? ईश्वरीकृपेने माझ्या जवळ काही नाही असे काहीच नाही.'

'बुवा, ही नकारात्मक भाषा नको. काही तरी मागा म्हणून आम्ही सांगतो ते नाही का लक्षात घेत ? ही आमची इच्छा

नाही. भगवंताची इच्छा आहे बरं.'

देवदूतांच्या तोंडून हे शब्द निघताच विश्वंभरबुवा गहिवरले ! त्या इच्छेला त्यांनी मान तुकविली. कर जुळवले आणि त्यांच्या नेत्रावाटे त्या करुणासागर मंगलमय परमेश्वराचे गुण आठवून अश्रुधारा सुरू झाल्या !

स्वत:ला सावरून विश्वंभरबुवा म्हणाले, 'ठीक तर. एक वरदान द्या. माझ्या हातून लोकांचे भले व्हावे– पण कोणालाही न कळत.'

देवदूत गोंधळून गेले. मग त्यांनी भगवंताचा सल्ला घेतला आणि विचार ठरविला, तो असा –

ज्या ज्या वेळी विश्वंभरबुवा चालू लागतील त्या त्या वेळी त्यांची छाया मागोमाग येईलच. पण ती त्यांना न कळत ही त्यांची छाया ज्या ज्या वस्तूंवर, प्राणिमात्रावर पडेल त्या छाया-शक्तीने लोकांचे रोग दूर व्हावे, यातना नाहीशा व्हाव्या, दैन्य संपावे, दु:खितांना. निराश्रितांना आधार मिळावा; सांत्वन व्हावे, समाधान, सुख शांती लाभावी !

त्याप्रमाणे होत गेले. जेव्हा जेव्हा विश्वंभरबुवा चालू लागत त्या वेळी त्यांची छाया ज्या ज्या वस्तूवर पडे त्यात चैतन्य निर्माण होई. ओसाड मैदानावर हरित तृणांची पखरण होई, वाळून कोळ झालेली शुष्क झाडे-झुडपे, फुलझाडे-फळझाडे पालवी फुटून तरारून हिरवीगार होऊन लागली. त्यांना फुले, फळे धरू लागली. कोरड्या पडलेल्या निर्झरांना, जलप्रवाहांना तलावांना, नद्यांना तुडुंब पाणी भरभरून वाहू लागल. सुकलेले बालगोपालांचे म्लानवदन सुहास्य झाले, दु:खी त्रस्त मातापित्यांना आनंदाचे भरते आले; रोग्यांचे रोग बरे होऊ लागले; विश्वंभरबुवांच्या केवळ छायेच्या प्रभावाने

त्यांना न कळत हे घडू लागले ! तेच त्यांना हवे होते.

संत महात्म्यांचे अस्तित्व हेच पुण्यपावन उपकारक होत राहते ते असे. संत तुकाराम महाराज म्हणत, 'आता उरलो उपकारापुरता.' भगवान रमण महर्षींच्या सान्निध्यात केवळ त्यांच्या कृपादृष्टीने साधकांना समाधान लाभे. दुःख दैन्य दूर होई. शंका नाहीशा होत. महात्म्यांच्या हालचालीत आणि दृष्टिक्षेपात चैतन्य भरारून ओसंडत असते आणि लोक कृतार्थ होतात.

□ □

४

# सूरजमल कोतवाल

राजस्थानात सुरेंद्रनगर नावाचं एक शहर आहे. या शहराच्या कोतवालाचं नाव सूरजमल कोतवाल. कोतवाल म्हणजे शहराचा पोलिस सुपरिंटेंडेंट. सर्व सत्ताधिकारी. सूरजमलचा रुबाब काही और असे. घोड्यावर बसून हातात चाबूक घेऊन फेरफटका करायला निघाला की, रस्त्यावरचे लोक बाजूला होऊन अदबीनं लवून सलाम करीत. त्याची अवकृपा झाली म्हणजे मरणप्राय यमयातनाच ! लोक चळचळा कापत आणि त्याची मर्जी संपादण्यासाठी हरतऱ्हेनं प्रयत्न करीत.

सुरेंद्रनगरच्या परिसरांत चार–पाच मैलांवर एक घनदाट अरण्य होतं. या जंगलात दादू भगत नावाचा एक साधू राहत असे. एक साधी झोपडी, साधा वेष व एकतारीवर भजन– परमेश्वराच्या गुणसंकीर्तनात दादू भगत आपला काळ कंठी. दिवसभर जंगलात फिरून लाकडं तोडी, रस्ते साफ करी आणि समाधानानं राही. त्याच्याइतका क्षमाशील, शांत, परोपकारी साधू दुर्मिळ !

सुरेंद्रनगरचे काही लोक गुणांचे भोक्ते होते. त्यांच्या कानावर दादू भगतची कीर्ती गेली. लोक झाडं-झुडपं, जंगलचे काटे-कुटे तुडवत दादू भगतच्या दर्शनास जात. दादू भगत एकतारीवर भजन करू लागला की त्यांचं भान हरपे; नेत्रावाटे भक्तीचा पूर लोटे; ज्या परमेश्वराच्या नामाचं तो गुणगान करी. तो परमेश्वर साक्षात् पुढे ठाकला आहे या भावनेनं तो भक्तिगीतं गाई. नरसी भगत, सूरदास, संत मीराबाई यांची गाणी गाऊ लागला की, ती ऐकताना भोवताली जमलेले लोकही रंगून जात. त्यांची तहानभूक हरपे. सर्व शहरात एकच विषय– दादू भगत ! किती थोर महात्मा ! गाणी ऐकावी तर त्यांचीच, भक्तिगीतं आळवावी तर त्यांनीच.

कोतवाल सूरजमलसाहेबांच्या कानावर ही दादू भगतची स्तुतिसुमनं गेली. कोण आहे हा भगत ? आणि मी अजून कसा पाहिला नाही ? जावंच त्याच्या दर्शनाला. छे ! छे ! त्यापेक्षा त्यालाच बोलवावे. कोतवालाचा हुकूम ऐकताच हात जोडून उभा राहील. काय आज्ञा खाविंद ? म्हणून विचारेल. कोतवालाचा अहंकार, सत्तालालसा जागृत झाली. पण दुसऱ्याच क्षणी वाटू लागलं की, आपणच त्याच्याकडे जावं. त्याची राहणी, वागणूक, विचार-आचार, बोलणं पाहावं. शंका आली तर त्यालाच हसडावं, वठणीवर आणावं आणि हुसकून लावावं. उगीच जनतेला भुरळ घालून नादी लावत असेल तर ! पण तसा नसेल तर त्यांचं दर्शन घेऊ. पाहू तर खरं !

कोतवालसाहेबांनी निश्चय केला. एके दिवशी घोड्यावर स्वार होऊन जंगलाचा मार्ग स्वीकारला. अहंकार, अभिमान, सत्तेचा मद अंतरंगात मुसमुसत होता. घोड्याला टाच मारून स्वारी जंगलात शिरली खरी, पण पुढे रस्ता सापडेना. रस्ताच

नव्हता तर सापडणार कोठून ? वाटेनं जाता जाता एक लाकूड-तोड्या मोळीविक्या दृष्टीस पडला. त्याला एक शिवी हासडून कोतवालसाहेबांनी विचारलं, ' काय रे, दादू भगतची झोपडी कुठं आहे ? '

एक नाही, दोन नाही. मोळीविक्यानं ऐकलं न ऐकलंसं केलं व आपलं काम सुरू केलं. काम काय होतं ? झाडं-झुडपं तोड, काटे-कुटे दूर कर, रस्ता साफसूफ कर... पाऊलवाट स्वच्छ कर. अंगातून घाम निथळत होता.

कोतवालसाहेबांनी पुन्हा एकदा शिव्यांची सरबत्ती सुरू करून हसडलं, ' कायरे वहिऱ्या, ऐकायला आलं नाही का ? मी काय विचारतोय– सांगतोस की लगावू थप्पड. '

ही दमदाटी शांतपणे ऐकून मोळीविक्या फक्त हसला. पण उत्तर नाही. कोतवालसाहेबांचा राग भडकला. त्यांनी चाबकाचा एक जबरदस्त फटकारा लगावला. मोळीविक्या कोलमडत कोलमडत खाली पडला ! बिचारा !

त्याच्याकडे उपहासानं पाहत कोतवालसाहेब पुढे दौडत निघाले. मैल-दीड मैल गेल्यावर एक मेंढपाळ दिसला. मेंढ्या पुढे चरत होत्या. मेंढपाळ मागून चालला होता. त्याला कोतवालानं विचारलं, ' दादू, भगतची झोपडी कुठे आहे ? किती लांब आहे ? ' मेंढपाळानं उत्तर दिलं, ' ती काय, त्या झुडपाच्या पल्ल्याड आहे. जवळच आहे; पण तुम्हाला दादू भगत या वक्ताला भेटणार नाहीत. ते तर आता लाकडं तोडायला, जंगल साफ करायला गेल्यात. तुम्ही आला ना त्याच वाटेवर हैती की. '

कोतवाल साहेब उद्गारले, ' काय ? मी आलो त्याच वाटेवर ? ' घोडा परत फिरवून आल्या मार्गाने ते परतले. मोळीविक्या भेटला

होता, तो तर नव्हे ? अरेरे ! इतक्यात त्यांना मोळीविक्या दिसला. बिचारा धडपडत उठून रक्तानं माखलेल्या कपाळाला धोतराची चिंधी बांधून जखम चोळत होता. हाच दादू भगत तर नसेल ?

कोतवालसाहेब समजले. घोड्यावरून उतरून जवळ गेले. पाया पडून म्हणू लागले, 'महाराज ! आपणच दादू भगत आहात ना ? मग मला प्रथमच का नाही सांगितलंत ? माझी फार मोठी चूक झाली. निष्कारण हत्या झाली; पाप घडलं ! मी तुमची क्षमा मागतो. महाराज, पण आपण हे काय करता आहात ? कशासाठी एवढा हा खटाटोप ?'

दादू भगतनं उत्तर दिलं, 'झाडं–झुडपं तोडून काटेकुटे बाजूला करून येणाऱ्या-जाणाऱ्यांना मार्ग सुकर व्हावा म्हणून प्रयत्न करतो आहे. अहो कोतवालसाहेब, परमेश्वराकडे जाण्याचा मार्गही असाच साधा, सरळ आहे. पण त्यावर काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार ईर्षा यांचं तण माजलं आहे. काटेकुटे पसरलेले आहेत. त्यामुळे वाट बिकट झाली आहे. मानवानं परमेश्वरप्राप्तीच्या मार्गावरील हे काटेकुटे दूर केले तर मी जसा हा मार्ग साफसूफ करतो तसे त्यालाही करता येईल...पण कोतवालसाहेब, आपण या जंगलात कुठं वाट चुकला ? काय शोधत आहात ? काय हवं ?'

कोतवालसाहेबांचं अंतःकरण विरघळलं, भक्तिभाव जागृत झाला ते हात जोडून नम्रपणे म्हणू लागले, 'महाराज, परमेश्वर-प्राप्तीसाठी मार्गदर्शक गुरू मिळावा म्हणून शोध करीत निघालो आहे; आपण भेटलात– दर्शन झाले. पण– पण माझ्या हातून हा भयंकर घोर अपराध घडला ! आता काय करू ?'

दादू भगत क्षणभर थांबले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य विलसलं,

ते म्हणाले, ' यात आपला अपराध कसा काय ? यात काय चूक झाली ? साधं मातीचं भांडं विकत घ्यायचं झालं तर चार-चारदा टिचक्या मारून पारखून तपासून ते आपण खरीदतो– मग गुरूची पारख करण्यासाठी तुम्ही मजवर प्रयोग करून तपासले यात तुमची चूक कसली ? अपराध तो कसला ?'

कोतवालसाहेब ओशाळले, शरमिंदे झाले. त्यांचं वदन म्लान झालं, मस्तक नम्र झालं, डोळ्यांवाटे अश्रुधारा निघाल्या. अहंकार, सत्तामद विरघळून गेले आणि मुखावाटे उद्‌गार निघाले –

' महाराज, क्षमा करा. हा कोतवाल आता भक्त होईल असं करा ! मुखावाटे आता नामसंकीर्तन होऊ दे. शिवीगाळ, लत्ता-प्रहार, चाबकांचे फटके, गुर्मी सर्वच्या सर्व आता गंगेला मिळालं. या अपराध्याला हाती घ्या आणि घडवा. '


दादू भगत मूर्तिमंत दयासागर, करुणामय भक्तवत्सल होते. कोतवालसाहेबांना ते झोपडीत घेऊन गेले. मोठ्या भावभक्तीने एकतारीवर सूर निघू लागले –

' कृष्ण गोविंद गोपाळ गाते चले ।
कृष्ण गोविंद गोपाळ गाते चले ।'

गुरु-शिष्य तल्लीन होऊन भजनात रंगून गेले. कोतवालाचं परिवर्तन झालं. भक्त-भगत एकरूप झाले !

□ □

# लोभाचे फळ



आदिवासी रानटी समाजाच्या वेळची ही कथा. फार पूर्वीची असली तरी बोलकी, ठसणारी. देवीचे उपासक देवाला प्रसन्न करण्यासाठी नरबली देत. ठगांच्या जबानीत अशा घटनांचा उल्लेख आढळतो.

दाट अरण्याजवळच असलेले एक खेडेगाव होते. त्याचे नाव पिंपळगाव. गावात पिंपळाचे प्रचंड, अमाप उंच उंच वृक्ष. त्यांना वृक्षराजच नाव शोभेल. या गावात मुरंजन नावाचे एक धनिक सावकार राहत. गरीब निरक्षर लोकांना कर्ज द्यायचे व व्याजापायी त्यांना राबवायचे हा त्यांचा धंदा. व्याजापायी मुद्दल कधी फिटायला नको. सावकाराची चैन चाले. काही दिवसांनी निरंजनदास नावाचे एक साधू त्या गावी आले. साधूंचे वैराग्य, साधा वेश, मुखावर तपश्चर्येचे तेज पाहून सावकाराने एके दिवशी बुवांना आपल्या घरी उपाहारासाठी बोलाविले. निरंजनदास निरिच्छ. ते

सावकाराच्या बोलण्याकडे कशाला लक्ष देतात ! वडाच्या झाडाखाली धुनी पेटवून साधू महाराज आपल्याच नादात, ब्रह्मानंदात निमग्न होते. सावकाराने पाठविलेल्या नोकरांना त्यांनी काहीच उत्तर दिले नाही. मग सावकार स्वत: जाऊन साष्टांग दडवंत घालून म्हणाला, 'महाराज, कृपा करा. आणि माझ्या निमंत्रणाचा स्वीकार करा.' सावकाराला धडा शिकविण्याची ही एक संधी आली आहे असे योजून साधुमहाराजांनी निमंत्रण स्वीकारले व ते सावकाराच्या घरी भिक्षा-भोजनास गेले. भोजनोत्तर गप्पागोष्टी करता करता सावकार महाशय विड्यासाठी अडकित्त्याने सुपारी कातरीत होते. कातरताना चुकून सुपारीऐवजी बोटाचा भाग अडकित्त्यात जोराने अडकला, टवका गेला आणि बोटातून भळभळ रक्त वाहू लागले. 'हाय. हाय, हे काय भलतंच झालं !' असे उद्गार सावकाराच्या तोंडून निघाले. साधुमहाराज म्हणाले, 'ठीक आहे, झालं ते बऱ्यासाठीच.' धावपळ सुरू झाली. सावकाराच्या बोटावर उपाय सुरू झाले. औषध लावले आणि बोटाभोवती चिंधी गुंडाळली गेली. साधुमहाराज मात्र हळहळ करण्याऐवजी 'ठीक, ठीक झालं' म्हणत होते. त्याचा सावकाराला फार राग आला. तो मनात म्हणाला, 'दया नाही तो साधू कसला. साधू महाराजांना त्याने निरोप दिला.

पुढे एकदा असाच एक प्रसंग घडला. साधूंच्याबरोबर दूरवर जाण्याची सावकाराची वेळ आली. प्रवासात एक नदी लागली नदीला पूर आला होता. नदीकडे पाण्यात पाय सोडून ते दोघे चर्चा करीत होते. मागचा प्रसंग आठवून सावकार म्हणाला, 'साधू महाराज, माझ्या बोटाचा टवका निघाला, रक्त वाहू लागले तरी तुम्ही झालं ते बऱ्यासाठी असे कसे म्हणालात ? आता नदी

आडवी आली ही अडचण नव्हे का. ' साधुमहाराज म्हणाले, ' छे छे, हेही बऱ्यासाठी घडत आहे. सावकाराला रागाचा झटका आला आणि त्या भरात त्याने साधू महाशयांना पाण्यात ढकलले आणि विचारले, ' महाराज हेही बऱ्यासाठीच ना ? ' साधुमहाराज पोहता पोहता म्हणाला, ' हो तर, अरे, बऱ्यासाठीच ! '

हे साधुमहाशय वेडपटच दिसतात, यांच्या नादी लागण्यात काहीच अर्थ नाही असे ठरवून सावकाराने परतीची वाट धरली.

परतीच्या वाटेवर सावकाराचा रस्ता चुकला, आणि आड-वाटेने तो रानात शिरला. गुरफटला. आता दिवस मावळला होता, वाट दिसेनाशी झाली होती. पुढे जायचे कसे ? असा विचार करतो तोच एक आदिवासींची टोळी नाचत, गाजत पालखी घेऊन सामोरी आली. जमातीच्या प्रमुखाने टाळ्या पिटल्या आणि सावकाराला पकडले. हे लोक देवीला बळी देण्यासाठी नरबली शोधत होते तो आयताच मिळाला. सावकाराचे धाबे दणाणले. त्याचा थरकाप उडाला. तो गर्भगळित होऊन गयावया करू लागला. पण या नरमांसभक्षक रानटी आदिवासी लोकांना त्याची काय दया येणार ! अंगावरचे कपडे उतरवण्यास सुरुवात झाली. नरबळीच्या अंगावर कोड, नायटे काही असता कामा नयेत; त्याचे अंग नितळ अव्यंग असले पाहिजे असा दंडक. पाहतात तो बळीच्या बोटाला चिंधी आणि जखम. छे छे, हा नरबली काय उपयोगाचा ? सावकार तर पूर्ण निराश होऊन घटका-पळे मोजत होता. इतक्यात त्याचे हातपाय मोकळे करून त्याला सोडून देण्यात आले..

' आपण साधुमहाराजांची निंदा केली म्हणून आपल्याला ही शिक्षा झाली. प्राणांवर बेतले होते, ललाटरेषा चांगली म्हणून

निभावले.' असा विचार करीत सावकाराने नदी गाठली. साधुमहाराज आपले भिजलेले कपडे धुऊन वाळवत बसले होते. सावकाराने जवळ येऊन पाय धरले. क्षमा मागितली. बोटाला जखम झाली होती म्हणून आपले प्राण वाचले, झाले ते ब-यासाठी हे आता पटले, पण साधुमहाराजांना मी पाण्यात ढकलले ते बऱ्यासाठी हे कसे ? सावकाराने प्रश्न केला. साधुमहाराज किंचित हसले आणि म्हणाले, 'अगदी उघड आहे. समजा, तुझ्याबरोबर मी निघालो असतो तर तुला जखमी म्हणून सोडले असते आणि मला धरले असते– माझा नरबळी त्यांना मिळाला असता. पण मला उशीर झाला म्हणून मी तुझ्याबरोबर आलो नाही म्हणून वाचलो. – पण पाहा आता दोघेही वाचलो ना ! नियतीची इच्छा वेगळी असते ती अशी. आता एक शंका राहिली.

'नदीला पूर आला त्यामुळे पुढे जाण्याचे रहित करावे लागले– तेही ब-यासाठीच का ?' सावकाराने शंका विचारली. साधुमहाराज द्रष्टे होते, ते म्हणाले, 'होय बाबा, आपण पलीकडे गेलो असतो तर भयंकर वादळात सापडलो असतो आणि कदाचित नाहीसे झालो असतो. सावकाराला आता पटले. साधुमहाराजांनी ही संधी साधून त्याला द्रव्याचा विनियोग गोरगरिबांसाठी करावा असा उपदेश केला. घरी परतल्यावर सावकाराने आपली सर्व संपत्ती दानधर्म करून वाटून टाकली व आपले जीवन कृतार्थ केले ! जे घडते ते बऱ्यासाठी.

Man proposes God disposes.

–हेच खरे.

☐ ☐

# चिदंबरम्‌चा नंदनार



चिदंबरम्‌ हे क्षेत्र नटराज मंदिरामुळे सुप्रसिद्ध आहे. नृत्यात रंगून गेलेल्या 'नटराजाचे' सुवर्णमंदिर दक्षिण भारतात एक यात्रेचे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण मानले जाते.

पंढरपूरचा जसा विठोबा तसाच चिदंबरम्‌चा नटराज शिव. पंढरीचा वारकरी ज्या निष्ठेने दर एकादशीला विशेषत: आषाढी-कार्तिकीला पंढरीला जातो, तसाच दक्षिण भारतातील भक्त नटराजाच्या दर्शनास शिवरात्री महोत्सवास जात असतो. नटराजाच्या दर्शनाने जीवन कृतार्थ झाले असे मानतो.

चिदंबरम्‌ या क्षेत्राजवळील दहा–बारा मैलांवर एका कुन्नूर नावाच्या खेड्यात नंदनार या नावाचा एक गरीब शेतकरी

राहात असे. सुब्रह्मण्यम् नावाच्या धनाढ्य सावकाराच्या एका शेतावर तो मजुरी करून उदरनिर्वाह करीत असे. सावकाराची शेती, व्यापार व सावकारी मोठी होती. जवळच्या पंचक्रोशीतच काय पण सर्व जिल्ह्यात तो धनाढ्य म्हणून प्रसिद्ध होता. सावकार म्हटला म्हणजे धनलोभी, व्याजाने कुळाला पिळून घेणारा, कंजूष हे दुर्गुण आलेच. याला हा सावकार तरी अपवाद कसा असणार? नंदनार अस्पृश्य, मागासलेल्या वर्गातला एक शेतकरी मजूर. शेतावर झोपडी बांधून राही, शेताची राखण करी, मशागत करी नांगर धरी आणि कष्टाने सर्व दिवसभर राबून पीक काढी. नंदनार अस्पृश्य असला तरी त्याची धर्मावर अत्यंत श्रद्धा होती. तो नटराज शिवाचा महान भक्त होता. सदा परमेश्वराचे गुणगान नामस्मरण करण्यात तो रंगून जाई. इतके कष्ट करून त्याला फक्त पोटापुरते मिळे. तेवढ्यातच गरिबीने तो गुजराण करी. 'कारभारीण' त्याला साथ देणारी, कोंड्याचा मांडा करून आहे त्यात सुखासमाधानाने राहणारी होती. नंदनारने आपल्या आईच्या आजारीपणात औषधपाण्यासाठी सावकाराकडून थोडे कर्ज घेतले होते. ते त्याला परत करता आले नाही. त्यानंतर त्याच्या स्वतःच्या लग्नासाठी त्याने शे-दोनशे रुपये कर्ज घेतले होते. त्याला आता किती तरी वर्षे लोटली होती. आजपर्यंत त्याच्या मिळकतीच्या धान्याच्या वाट्यातून थोडी भरपाई होई. पण मुद्दल मात्र तसेच राहिले. कर्ज फिटण्याची चिन्हे त्याच्या हयातीत तरी दिसतील की नाही याची शंका होती; नंदनारने या हिशेबाची कधी फिकीर केली नाही. 'सावकाराकडे हिशेब-कागदपत्र सर्व आहेतच मग मी निराळे कशाला काय ठेवू आणि मला तरी लिहाय-वाचायला कुठे येतंय' अशी त्याची भोळी भावना. सावकाराने त्याच्या

भोळेपणाचा भरपूर फायदा घेतला.

सावकाराची व त्याची गाठ प्रत्यक्ष वर्षातून एक-दोनदा काय ती पडे. एकदा धान्यपेरणीच्या वेळी व एकदा मशागत झाल्यावर धान्य सावकाराच्या घरी भरण्याच्या वेळी. सावकारापुढे तो बोलायला धजत नसे. दिवाणजी जो हिशेब करतील तो खरा. 'व्याज इतकं फिरतं– मुद्दल आता एवढं राहिलं' एवढा आकडा कानाने ऐकायचा आणि सावकाराला दंडवत घालून पुन्हा शेतावर कामाला जायचे.

एके वर्षी नंदनारच्या शेतावरून चिदंबरम्‌ला नटराजाच्या दर्शनास जाणारी यात्रेकरू मंडळी भेटली. त्याने यात्रेकरूंच्या पायांवर डोके ठेवले. त्याच्या मनाला गेली दोन-तीन वर्षे दर्शनास जाण्याची ओढ लागली होती, पण जाणार कसा ? ही गोष्ट सावकाराजवळ काढायची कशी असा पेच त्याला पडला.

उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः। या म्हणीप्रमाणे त्याची ही इच्छा दर वर्षी अतृप्तच राहिली.

तिसऱ्या वर्षी शिवरात्रीच्या दिवशी त्याला चिदंबरम्‌ला जाण्याची नटराजाच्या दर्शनाची उत्कंठा लागली. ती इतकी वाढली की, त्याला रात्रंदिवस दुसरे काही सुचेना. पुढच्या वर्षी काय वाटेल ते होवो सावकाराकडे जायचे, आपली इच्छा बोलून दाखवायची ; परवानगी मिळवायची. पण नाही मिळाली तर– नाही मिळाली तर ? तो मनाशी विचार करू लागला. 'नाही मिळाली तरी जायचं.' त्याच्या मनाने निश्चय केला.

त्यानंतरचे सर्व वर्ष त्याने परमेश्वरचिंतनात घालविले, 'शिवाय ॐ नमः शिवाय नमः' हा जप चालविला. हाताने शेतात काम करावे. मुखावाटे चिदानंदरूप नटराजाचे गुणगान करावे !

शिवस्तोत्र म्हणावे. होय. तो एका शिवभक्ताजवळ महिम्न शिवस्तोत्र शिकला होता. तेवढेच स्तोत्र त्याला येत होते.

दुसऱ्या वर्षी शिवरात्र जवळ येत चालली तसे त्याचे मन ओढ घेऊ लागले. एके दिवशी त्याने धाडस करून सावकाराचे घर गाठले. दिवाणजीने धुडकावून लावले, पण या खेपेस सावकाराची गाठ घ्यायची, आपले म्हणणे कानावर घालायचे या निश्चयाने तो वाट पाहत राहिला. सावकाराने त्याची गाठ घेतली; त्याचे म्हणणे ऐकताच त्याने त्याची टर उडवण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, ‘अरे नंदनार, तुला वेड तर लागलं नाही? अरे, तुझी जात कोणती, कूळ कोणत्या दर्जाचं याचा काही विचार केलास का? तुझी जात हलकी. तुला कोण दर्शन घेऊ देणार? देवदर्शन तर लांबच पण मंदिराजवळ तरी तुला कोणी जाऊ देईल का? तू त्या भानगडीत पडू नको. फुकट मार खाशील–उपाशी मरशील–परत यावं लागेल. देवदर्शन होणार तर नाहीच पण आजारी-बिजारी झालास की शेतीही तुझ्या हातून व्हायची नाही. मग वर्षभर खाणार रे काय?–’

एवढी सरबत्ती झोडून त्याने दिवाणजींना बोलावून विचारले, ‘दिवाणजी, याच्याकडं किती येणं आहे हे पाहिलंत का?–सांगा, याला त्याला त्याचा हिशेब आणि मुद्दल किती येणं आहे, केव्हा देणार याचा जाब विचारा.’

बिचारा नंदनार हिरमुसला झाला. परत फिरला. त्याच्या नेत्रांवाट अश्रुधारा सुरू झाल्या. ‘मग यंदाही त्या नटराजाचं दर्शन होणार नाही तर! किती मी अभागी? कशाला या गरिबीत हीन कुळात जन्माला आलो?’ असाही विचार त्याच्या मनात येऊन गेला.

दुसऱ्या वर्षी पुन्हा त्याने मनाचा धडा केला. सावकाराला वाटले, नंदनार हा मोठा देवभोळा आहे. कोणी त्याला भुलविले तर जाईलही कदाचित तो चिदंबरम्ला. पण परत येईल, की नाही कोण जाणे ? इतका प्रामाणिक, कष्टाळू, गरीब शेतकरी आपल्याला फुकटचा राबवायला मिळतो आहे. तो गेला तर शेती कोण करणार ? केवळ अन्नावारी राबून घेणारा शेतकरी कोण मिळणार? त्याने मग जरा समजुतीने घेतले आणि तो म्हणाला, 'नंदनार ! अरे चिदंबरच्या नटराज दर्शनाचं वेड तुझ्या डोक्यात कुठून शिरलं ! तू शेतावर असतोस, काम करतोस तेव्हा देवाचं नाव घेत असतोस ना ? मग त्या नटेश्वर शिवशंकराला तुझी भक्ती कशी कळत नाही ? तो तुझ्या भक्तीला कसा धावून येत नाही ? अरे, तो सर्वत्र भरलेला आहे ना ? मग चिदंबरम्लाच कशाला जायला पाहिजे ? इतकंही करून वाटल्यास जा बाबा, पण वेळेवर चार दिवसांत परत फिरला नाहीस तर तुझी धडगत नाही. तुझी झोपडी काढून टाकीन शेतकूळ बदलून दुसरा वाटेकरी शेतकरी नेमून टाकीन. पाहा, विचार कर. हा तुझ्या जीवनाचा प्रश्न आहे. तुझा हा उतावीळपणा मला काही पसंत नाही !

झाले, नंदनारला हे बोधामृत रुचले नाही. पण जरा दहशत वाटली. तो मनाशी म्हणू लागला, 'नटराज शिवशंकराची इच्छा मी दर्शनास यावं अशी आहे की नाही कोण जाणे ? ते सगुण साकार सोज्वळ नयनमनोहारी नृत्यात दंग झालेलं स्वरूप मला या जन्मात तरी दिसणार आहे की नाही ?'

हे भगवान, मी तुझ्या दर्शनास येण्याचा निश्चय करावा आणि सावकारानं मोडता घालावा. सावकारचं हृदय इतकं कसं पाषाणासारखं कठोर ! सदा मुद्दल, व्याज, सावकारी याशिवाय काही

विषय नाही का ? मी इतकी वर्षं केवळ अन्नावारी राबतो त्याची काहीच का दया येऊ नये सावकाराला !'

तिसऱ्या वर्षी पुन्हा त्याच्या मनाने उचल घेतली, ' आपण दर्श-नाला जायचंच !' त्या रात्री त्याला आदेश ऐकू आला, ' नंदनार आता विचार करू नकोस. मी तुझ्या दर्शनासाठी उतावीळ झालो आहे. तू आला नाहीस तर मला यावं लागेल.' नंदनारने हा आदेश ऐकला मात्र, त्याने निश्चय केला. ' यंदा शिवरात्रीला चिदंबरम्ला जायचंच. मग वाटेल ते होवो. तो त्याच क्षणी सावकाराकडे गेला आणि म्हणाला, ' मायबाप, कृपा करा. मला जाऊ द्या. मला आता राहवत नाही. मी यंदा जाणारच. लवकर परत येईन. आता या शिवरात्रीस आशुतोष शिवशंकराचं– नटराज शिवाचं दर्शन घेतल्या-शिवाय अन्न ग्रहण करणार नाही !' एवढे बोलून ' जोहार मायबाप जोहार 'असा लवून मुजरा करून सावकाराच्या परवानगीची वाट न पाहता तो तिथून तडक निघाला. सावकाराचे धाबे दणाणले. तो मोठ्याने हाक मारून म्हणाला, ' अरे नंदनार, थांब जरा. जाणार तर जा बापडा. मी कशाला आड येऊ ? पण लक्षात ठेव चार दिवसांत परत आला नाहीस तर मी तुझी गय करणार नाही.'

हे शब्द नंदनारच्या कानात शिरलेच नाहीत. ' देह जावो अथवा राहो ' या निश्चयाने नंदनार तिथून निघाला. त्याच्या पायाला जणू पंख फुटले. आनंदाने त्याची पदयात्रा सुरू झाली. मनात विचार येत होते. ' फार दिवसांची इच्छा पुरी होणार ! त्या नटराज शिवाचं दर्शन शिवरात्रीच्या पुण्यमय दिवशी घड-णार. नटराजाच्या दर्शनानं या नंदनारच्या नेत्रांचं पारणं फिटणार. मंदिराचं आणि नटराज शिवशंकराचं दर्शन झालं की, मग कुठलं

परत फिरणं ! मी माझा राहणार नाही. नटराजाची इच्छा असेल तसं घडेल !'

पिंजऱ्यातला पोपट पिंजऱ्याबाहेर पडला होता. मोहरलेले आम्रवृक्ष दृष्टीस पडले म्हणजे पक्षी जसे आनंदून जातात तसे नंदनारचे मन आनंदाने ओसंडून जात होते. तरी अजून दर्शन व्हायचे होतेच. मजल दरमजल करता करता पहाटेच्या वेळी नंदनार चिदंबरम्‌च्या परिसरात आला. लांबूनच गोपुराचे दर्शन झाले. जवळ गेल्यावर कळसाचे दर्शन घडले. त्याचे देहभान हरपले. श्रमपरिहार, तहानभूक शमली. ज्या दर्शनासाठी नंदनार इतकी वर्षे उतावीळ झाला होता, पाण्याविना मासोळी तळमळते तशा मनःस्थितीत वावरत होता ते सगुण सोज्वळ, शिवदर्शन त्याला आज होणार होतं. कळसाचे दर्शन प्रथम होताच त्याने जमिनीवर लोटांगण घातले. आता मंदिर दृष्टिपथात आले. दर्शनासाठी जमलेल्या यात्रेकरूंची कोण झुंबड ! मंदिराच्या सभामंडपात आपणाला कसा प्रवेश मिळणार ? गर्भागारापर्यंत कसे पोहोचणार ? नटराज शिवाचे दर्शन दुरून तरी होईल का, या उत्सुकतेने तो आपले अंग चोरून कसाबसा पुढे पुढे जात होता. ' आपली जात कळली, कोणी ओळखलं तर लांबूनच हाकलून देतील मग दर्शन कुठलं न्‌ काय ?' तो कसाबसा बाहेरच्या सभामंडपापर्यंत पोहोचला. टाचा उंच करून पाहण्याचा प्रयत्न करतो तो नंदीची दगडी मूर्ती पुढे. त्यामुळे दर्शन होईना. दूरवर गाभाऱ्यात असलेली नटराज शिवाची मूर्ती दिसेना. त्याने आर्त स्वराने करुणा भाकली, ' हे नटराज, करुणासागरा, मला दुरून तरी दर्शन द्या. मी तळमळीनं आलो आहे आणि दर्शनाशिवाय अन्न ग्रहण करणार नाही अशी प्रतिज्ञा करून. सावकारानं तर निक्षून सांगितलं, ' तुला

दर्शन होणार नाही. हाकलून लावतील.' आता तुमच्या दर्शना-शिवाय हा देह येथून हलणार नाही ! देवा अंत नका हो पाहू. माझी गरिबाची इच्छा पुरी करा !'

नंदनारची ही करुण हाक नटराज शिवाला केव्हाच ऐकू आली. तो केव्हा येतो याकडे त्या कैलासराणा शिवशंकराचे लक्ष होतेच. देव भक्तांचा भुकेला असतो. हां हां म्हणताच नंदीची दगडी मूर्ती जरा बाजूला सरकली. नटराजाचे दर्शन नंदनारला घडावे म्हणून ही योजना केली. नंदनार पुन्हा टाचा उंच करून पाहतो तो काय आश्चर्य ! नटराज शिवाचे दर्शन त्याला घडले. नंदनारने आपली दृष्टी मूर्तीवर खिळवली. त्याच्या नयनांतून भक्तिभावाने अश्रूंचा पूर लोटू लागला. आनंदाचा कल्लोळ हृदय-मंदिरात सुरू झाला. तो नाचू लागला. —पण आता देवालाच भक्ताला भेटण्याची इच्छा झाली. नटराजाची मूर्ती हलू लागली. भाविकांना पुजाऱ्यांनाही हे दृश्य जाणवले. भगवान नटराज शिव पुन्हा नृत्यास आरंभ करतात की काय असे भासू लागले. शिव-मुखातून वाणी स्रवू लागली, ' अरे, तो पाहा नंदनार मला भेटा-यला आला आहे. जा आणि त्याला आत मजपाशी घेऊन या. मला भेटवा. त्यासाठी मी अत्यंत उत्सुक झालो आहे. जा, पाहता काय ? आणा त्याला लवकर !'

ही देववाणी कानी पडताच महिम्नस्तोत्र पठणात गुंतलेले ब्राह्मण, पूजोपचारात गढलेले पुजारी स्तिमित झाले ! बाहेर येऊन शोध करू लागले. असा कोण भाग्यवान भक्त भेटीला आला आहे; कोणत्या गावचा कोण जाणे ? 'नंदनार, नंदनार– पुढे ये ' म्हणून हाका मारण्यास सुरुवात झाली. नंदनारला ओळखून काढण्यास वेळ लागला नाही. शिवदर्शनाने भारावून गेलेला, हात जोडून

मुखावाट नटराज शिवाचे नाव घेत असलेला नंदनार बाहेर उभा होता. तो स्पृश्य की अस्पृश्य, त्याला आत न्यावे कसे असा विचा-रही त्यांच्या मनात आला नाही. नंदनारला दोन्ही हातांनी धरून पुजाऱ्यांनी गर्भागारात थेट नटराज शिवमूर्तीपुढे आणून उभे केले. नंदनारच्या आनंदाला पारावार राहिला नाही.तो डोलू लागला,गाऊ लागला! प्रार्थना आळवू लागला. 'हे करुणावत्सला दीनदयाळ नटराज, तू माझ्यासाठी केवढं प्रेम दर्शविलंस! तू बोलू लागलास. मला दर्शन दिलंस– मी किती भाग्यवान! माझी इच्छा परिपूर्ण झाली. जीवनाचं सार्थक झालं 'योगिया दुर्लभ तो मी देखीला शुभ दिनी.' आता एवढीच इच्छा. तुमच्या चरणकमली मला अढळ स्थान द्या. 'अमृताहुनी गोड तुझे रूप– गोड तुझे नाम' ही अनुभूती सतत येवो.' आणि एवढे म्हणताच नंदनारने नटराजाच्या पायांना कडकडून मिठी मारली! असे काही क्षण गेले. तो मिठी सोडेचना. हालचालही दिसेना. पुजाऱ्यांनी हाक मारली– ओ नाही. स्पर्श केला– हलविले तरी हालचाल नाही. धरून उठवायला लागतात तो काय! नंदनारचा देह अचेतन झालेला! नंदनारची ज्योत नटराजाने आपल्या दिव्य ज्योतीत सामावून घेतली! आपल्या हृदयात अढळ स्थान दिले! आता नंदनार परत फिर-णार नव्हता. सावकाराचे काळे, स्वार्थी, निर्घृण मुखावलोकन करणार नव्हता. सर्व मांगल्याचे, सर्व सुखाचे आगर परमनिधान त्याला लाभले होते.

पुजाऱ्यांनी व जमलेल्या भाविक यात्रेकरूंनी हे दृश्य पाहिले. त्यांचे अंतःकरण हेलावले. हां हां म्हणता ही वार्ता सर्वत्र पसरली. कुन्नूरच्या नंदनारला साक्षात शिवदर्शन झाले. नटराजाने त्याला पाचारण करून बोलावले. त्याला कडकडून मिठी मारली,

दर्शनसौख्य दिले आणि आपल्या हृदयमंदिरात अढळ स्थान दिले. शिवरात्रीच्या दिवशी ! धन्य तो नंदनार !

नंदनार अस्पृश्य असूनही महान शिवभक्त झाला. परमेश्वराजवळ असा कोणताच भेद नाही. तो भक्तीचा भुकेला असतो. भक्ताच्या हृदयात भगवंताचा वास आणि भगवंताच्या हृदय-मंदिरात भक्तांना स्थान असे हे भक्तीचे अतूट नाते आहे. ' सर्वस्यचाहं हृदि सन्निविष्टो ' हे भगवत्‌वचन प्रसिद्धच आहे.

इकडे नंदनारला झालेल्या दर्शनसोहाळ्याची वार्ता व त्याच्या देहावसानाची वार्ता कुन्नूरला पोहोचली. सावकार सुब्रह्मण्यम्‌चा त्यावर विश्वास बसेना. पण सर्वजण सांगू लागले तेव्हा तोही थक्क झाला ! तो नंदनारची वाट पाहत होता. त्याला काळजी होती ती आपल्या शेताच्या मशागतीची. नंदनारसारखा विश्वासू' प्रामाणिक, कष्टाळू शेतकरी कोण मिळणार ! त्याची खात्री होती की, नंदनारला दर्शन घडणार नाही. त्याला हाकलून देतील, त्याची निर्भर्त्सना होईल. मग गयावया करीत तो माझ्याकडे येईल– मग त्याला आपण चांगले सुनवू– असे मनात मांडे खात असताना सावकाराच्या कानी आले ते अद्‌भुतच ! मग विजेचा झटका बसावा तसे त्याचे मन पालटले. चित्तवृत्ती हेलावल्या. त्या क्षणी नंदनारला भेटायला जावे अशी उत्कंठा त्याला लागली. नंदनारला भगवान नटराज शिवाने दर्शन दिले आणि आपण मात्र त्याच्या मार्गात सदैव अडथळा आणून मोडता घालत होतो याचे त्याला राहून राहून वाईट वाटत होते. तो तत्काळ कुन्नूरहून निघाला. मंदिरात येऊन पाहतो तो नंदनारच्या पार्थिव देहाचे अंत्य संस्कार मंदिराच्या परिसरात करण्याचे पुजाऱ्यांनी ठरविले होते,त्याप्रमाणे व्यवस्था सुरू होती. इतक्यात त्याने नंदनारचे कलेवर पाहिले आणि त्याचे प्रेत

पाहिले मात्र–त्याने कडकडून मिठी मारली. त्याची क्षमा मागितली– ‘मी करंटा, इतके दिवस तुला जाऊ दिलं नाही. तुला परत येण्यासाठी आणा–शपथा घातल्या. तुला वेडा, उतावळा ठरविलं, तुला पैशासाठी हैराण केलं– पण तू किती भाग्यवान ! तुझी भक्ती किती थोर ! भाग्य केवढं ! खरा भगवद्‌भक्त तू. हे नटराज, मला क्षमा करा– नंदनार मला क्षमा करशील ना ?’– पण हे शब्द ऐकायला नंदनार होता कुठं ? तो तर कैलासपती शंकराच्या पादपद्मी केव्हाच स्थिरावला होता. सावकाराला उपरती झाली. त्याचा कायाकल्प झाला. तो काकुळतीने विनवू लागला– ‘नंदनारचे अंत्यसंस्कार मी माझ्या गावी कुन्नूरला करणार. मी त्याचा पार्थिव देह तिथं घेऊन जाणार.’

नंदनारचा पार्थिव देह सावकाराने कुन्नूरला वाजत गाजत आणला. ज्या शेतात नंदनार जन्मभर राबला त्याच्या झोपडी-जवळच्या जागेत त्याच्या पार्थिव देहास अग्निसंस्कार झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात ‘जय नंदनार’ या घोष झाला.

सावकाराने आपली शेत–वतनवाडी विकून टाकली. सावकारी बंद केली. नंदनारचा तो भक्त झाला. त्याचे गुणगान करण्यात धन्य मानू लागला. त्याने नंदनारचे मंदिर बांधून एक भव्य स्मारक उभारले. नंदनार या महान् भक्ताच्या दर्शनास गावोगावचे भक्त लोटू लागले. ‘स्वामी नंदनार’– चिदंबर नटराजाचा महान् भक्त, साक्षात्कारी संत म्हणून त्याची ख्याती चोहीकडे पसरली. अस्पृश्य म्हणून जन्माला आलेला, दारिद्र्याने पछाडलेला एक गरीब कष्टाळू, साधा शेतकरी मजूर आपल्या उत्कट भक्तीने संतपदास पोहोचला ! नंदनारचे नाव अजरामर झाले ! ’

☐ ☐

## नको तेव्हा आठवण !

एक होता राजा. तो सुखी, आनंदी होता. पण एक वैगुण्य होते. त्याला टक्कल पडले होते. त्यामुळे तो सदैव दुःखी असे. राजाचे नाव होते विक्रमसिंह. त्याच्या दरबारी अनेक नामांकित वैद्य, हकीम होते. सर्वांनी औषधं दिली, उपाय केले, पथ्यपाणी सांगितले. पण गुण येईना आणि राजाच्या डोक्यावर केस काही उगवेनात. राजा वैतागला. अकाली वार्धक्य आलेले दिसू लागले. त्यामुळे राजा नेहमी उदास असे.

अखेर एके दिवशी त्याने दरबार भरवून राजवैद्याला बोलावले व आज्ञा केली. वैद्यराज, तुमच्यासारख्यांना मी निष्कारण आश्रय दिला. इतकी वर्षे जोपासले. तुम्हाला प्रत्यक्ष राजाला बरे करता येत नाही मग तुम्ही गोरगरिबांचे रोग काय बरे करणार ? तुम्हाला गुणकारी औषध-योजना करता येत नसेल तर चालते व्हा माझ्या राज्यातून ! आजपासून मी तुम्हाला फक्त एक वर्षाची मुदत देतो. एवढ्या वेळात तुम्ही स्वतः योजना करा, अगर कोणी धन्वंतरी आणा. उपाय गुणकारी ठरलाच पाहिजे. माझ्या माथ्या-वर काळे कुळकुळीत भरपूर केस उगवले पाहिजे... आणि हे

तुम्हाला करता आले नाही तर पुढच्या संक्रांतीला तुमच्यावरच संक्रांत आली म्हणून समजा.

झाले. आता आली का पंचाईत? राजवैद्याची तर गाळणच उडाली. कोणाला काही सुचेना. असा रामबाण उपाय माहीत असता तर योजना करून राजेसाहेबांची मर्जी सांभाळता नसती का आली! सर्वत्र औषध-योजनेसाठी धावपळ सुरू झाली. दिवस जसे जसे जाऊ लागले तशी काळजी वाढू लागली. राजवैद्यांना खाणेपिणे सुचेना. ते धन्वंतऱ्याच्या शोधार्थ निघाले. जाता जाता योगायोगाने त्यांची एका निष्णात धन्वंतऱ्यांशी गाठ पडली. त्यांचे नाव होते वैद्यराज राजशेखर चूडामणी मार्तण्ड. ते म्हणाले, मी येतो, रोग्याला तपासतो, निदान करतो आणि योजना सुचवितो. उपायही करतो. काळजी करू नका. मी स्वतः भेटतो तुमच्या राजेसाहेबांना. करतो हे औषधपाणी. तुम्ही निर्धास्त रहा वैद्यराज.'

चूडामणी मार्तण्ड राजधानीत आले. राजाला भेटायला राजवाड्यात गेले. राजाला तपासले. चेहरा गंभीर केला आणि म्हणाले, 'रोग असाध्य आहे. पण आमचीही काही तपश्चर्या साधी नाही. अश्विनीकुमारांचे आम्ही वंशज. पाहू रोग कसा बरा होत नाही तो. अहो, मी मी म्हणणारे दुर्धर रोग बरे केले. असाध्य रोग्यांना जीवदान दिले. ते आम्ही या अशा रोगाला हार जाणार नाही.'

वैद्यभूषण चूडामणी मार्तण्डाची योजना सुरू झाली. पण योजना सुरू करण्यापूर्वी त्यांनी सहा महिन्यांची मुदत मागून घेतली. 'ती संपेपर्यंत अवाक्षर बोलायचे नाही. विचारायचे नाही. पथ्यपाणी कटाक्षाने सांभाळायचे. लागेल तो खर्च औषधीसाठी द्यायचा.' अशी अट घातली. राजाने सर्व अटी कबूल केल्या, पण म्हणाला,

' मार्तण्ड महाराज, तुमच्या उपायाने सहा महिन्यांत गुण आला नाही तर तुमची धिंड काढून हाकलून देण्यात येईल. आहे कबूल ?' चूडामणी मार्तण्डांनी मान डोलावली.

आता कसोटीची वेळ होती. चूडामणी मार्तण्ड वैद्यराजांची, राजाने उत्तम बडदास्त ठेवली. औषध-प्रयोगासाठी एक रसशाळा तयार करून दिली. हवी ती साधने मिळवून दिली. चाकर नोकर दिमतीस ठेवले. धन्वंतरी महाराजांचे संशोधन सुरू होते. पण ते केवळ होते नाटक. या मूर्ख राजाच्या डोक्यावर कल्पान्तीही केस उगवणार नाही हे निदान त्यांनी केले होते. पण उघडपणे बोलण्याची सोय नव्हती. ते मजेत आनंदात राहात होते. हमखास उपाय म्हणून एक साधे तेल तयार करून राजाला डोक्याला चोळायला सांगितले.

असे करता करता महिना झाला. दुसरा महिना गेला. तिसरा-चौथा-पाचवा महिनाही संपत आला. राजाला दम निघेना. तो रोज आरशात पाही एखादा केस उगवण्याचे चिन्ह दिसते तरी त्याला समाधान झाले असते. पण केस उगवण्याचे नाव नाही. त्याला शंका आली. पण अगोदर विचारायचे नाही ही अट होती ना ! करतो काय ? तोंड दाबून बुक्क्यांचा मार. इकडे राजवैद्यांचेही धाबे दणाणले होते. धन्वंतरी मार्तण्डाची योजना सफल झाली नाही तर ?

सहा महिने पुरे होण्यास अवघे पंधरा दिवस राहिले. राजाने मार्तण्डांना पुन्हा इषारा दिला व घातलेल्या अटीची आठवण दिली. ' वैद्य मार्तण्डराज, मुदत संपत आली. गुण येण्याचे चिन्ह तर दिसतच नाही. पाहा सांभाळा हं– नाही तर–'

मार्तण्डराज म्हणाले, ' महाराज काळजी कशाला ? अजून

पंधरा दिवस आहेत. आताच एक औषध रसायनशाळेत तयार झाले आहे. उद्यापासून ते लावायचे. पाहा मग चमत्कार !'

दुसऱ्या दिवशी एक नवे औषध तयार करून वैद्यराज आले व म्हणाले, 'महाराज, निजण्यापूर्वी हे औषध डोक्याला चोळून चोळून लावायचे. पण एक अट आहे. हे तयार केले आहे कोहळ्यापासून. आहे रामबाण; पण लावताना काय वाटेल ते झाले तरी कोहळ्याची आठवण काढायची नाही. नाव घ्यायचे नाही. हे पथ्य फार कडक आहे. कोहळ्याची आठवण झाली तर उपाय निष्फळ. फक्त सहा दिवस लावायचे. सातव्या दिवशी केस उगवतील, वाढू लागतील आणि हां हां म्हणता तुमच्या डोक्यावर काळ्याभोर केसांचा टोपच उगवेल, याचे प्रत्यंतर तुम्हाला येऊ लागेल. पण कोहळ्याचे नाव घेतलेत, आठवण काढलीत तर मात्र माझे प्रयत्न फुकट जातील. मग मला पुन्हा सहा महिने खटपट करावी लागेल.'

राजाने तेल चोळण्यास सुरुवात केली. पाच दिवस कोहळ्याची आठवण सुद्धा काढली नाही. कोहळ्याचे नावही मनात आणले नाही. आता फक्त एक दिवस उरला. सहाव्या दिवशी सकाळी तेल चोळताना राजा मनातून आनंदून गेला व म्हणाला, 'बरे झाले मी संयम राखला कोहळ्याचे नावही घेतले नाही.' हे उद्‌गार त्याच्या तोंडून निघतात तोच वैद्यराज हजर. त्यांनी स्वतःच हे शब्द ऐकले होते. झाले! त्यांनी कपाळाला हात लावला आणि म्हणाले, 'सर्व प्रयत्न फुकट गेले. व्हायला नको तेच नेमके झाले. नेमकी नको ती आठवण का काढलीत ? असं झालं तर मी तरी बापडा काय करणार ? अहो, पथ्य पाळलं नाही तर औषधांचा

काय उपयोग होणार, कपाळ ?

राजाने गुन्हा कबूल केला. क्षमा मागितली. म्हणाला, ‘ पुन्हा असे होणार नाही. आता दुसरे औषध तयार करून द्या.’

मार्तण्ड चूडामणींनी पुन्हा सहा महिने मुदत मागून घेतली. आता नवीन रसायन तयार केले. ते आंब्यापासून. लावताना तेच पथ्य राजेसाहेबांना सांगितले. उपाय सुरू झाले. आता मुदत दिली होती ती पंधरा दिवसांची. या दिवसांत औषध लावताना आंब्याची आठवण येऊ द्यायची नव्हती. या खेपेस राजेसाहेबांनी फार दक्षता घेतली. ते होते मे महिन्याचे दिवस, आंब्याच्या सुगीचे. तरी राजवाड्यात आंबा दृष्टीस पडता कामा नये अशी दक्षता घेतली होती. औषधयोजना चौदा दिवस सुरू होती. आता उरला शेवटचा दिवस राजेसाहेब खुषीत होते. आंब्याचे नावही त्यांनी काढले नाही. शेवटच्या दिवशी सकाळी प्रासादाच्या गवाक्षातून सहज बाहेर नजर गेली तो समोरच्या आंब्याच्या झाडाला आंबेच आंबे लटकलेले. शेंदरी, तांबूस, मोठमोठे झालेले. तेल लावायच्या वेळी आंब्यांची आठवण सारखी होऊ लागली. तोंडाला पाणी सुटले, पण इकडे उपाययोजना फुकट जाणार म्हणून हळहळ वाटू लागली.

ही दुसरी योजनाही फसली. वैद्य मार्तण्डराव आणखी सहा महिन्यांची मुदत मागून घेत आणि मजेने राहात. अशा पाच पंचवार्षिक योजना झाल्या. तरी उपायाने गुण आला नाही. राजा तर दिवसेंदिवस खंगत चालला, वृद्ध दिसू लागला. औषध मिळाले पण पथ्य सांभाळता आले नाही. शेवटी वैद्यराजच कंटाळले; म्हणाले, ‘ महाराज, आता मी काशीयात्रेला जातो. ही शेवटची

औषधाची बाटली. ही तयार केली आहे पिंपळाच्या सालीपासून. उपाय हमखास. गुण हटकून येईल. पण फक्त पिंपळाचे नाव घेऊ नका. औषध लावताना पिंपळाच्या झाडाची आठवण काढलीत की औषधाचा गुण येणार नाही.

पण राजाला ऐनवेळी पिंपळाच्या झाडाची आठवण झालीच. टक्कल तसेच राहिले. जे नको ते घडत होते. नको तेव्हा आठवण येत होती. शेवटी मृत्यूनेच राजाचा प्रश्न कायमचा सोडवला !

★ ★

७

# तीन प्रश्न



एकदा एक पंडित राजाकडे गेला. पंडिताची विद्वत्ता आणि सद्‌गुण लक्षात घेऊन राजाने त्याची दरबारात एका प्रमुख जागेवर नेमणूक केली. राजपुत्रांना शिक्षण देण्याचे कार्य त्याचेवर सोपविले. दरबारातील काही सरदारांनी राजेसाहेबांना सुचविले की, या पंडितांची प्रथम कसून परीक्षा घ्या. त्याला वेचक प्रश्न विचारा.

राजाला पांडित्याचे वावडे, पण त्याला काही वेचक प्रश्न तयार करून देण्यात आले. पंडिताची परीक्षा घेण्याचे ठरले. दरबार भरला. भर दरबारात राजाने नवागत पंडिताला विचारले, ' पंडितजी, आपण शास्त्राचे अध्ययन केलेले. अध्यापनातही आपण तरबेज. मग मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरे द्या पाहू.'

१. परमेश्वराचे तोंड कोणत्या दिशेकडे आहे ? २. तो बसतो कोणत्या जागी ? ३. खातो काय आणि उद्योग काय करतो ?

प्रश्न सोपे नव्हते. विचार करून उत्तर द्यायला वेळ लागेल म्हणून पंडिताने आठ दिवसांची मुदत मागून घेतली.

या आठ दिवसांत पंडित सतत विचार करीत होता. पण नेमकी उत्तरे काय द्यायची कशी पटवायची हे समजेना. आठ दिवसांची मुदत संपली. उद्या दरबारचे बोलावणे येईल त्या वेळी कसा जाणार, काय उत्तरे देणार, या विवंचनेत पंडितजी असताना त्यांचा एक नोकर शामजी जवळ येऊन विचारू लागला, ' पंडितजी, आपणाला एवढी काळजी कशाची लागली आहे. गेले आठ दिवस आपली प्रकृती बिघडली काय ? झोप नाही. खाण्यापिण्यावर लक्ष नाही. एवढे चिंताग्रस्त कशाने झाला. पंडिजींना आता सांगणे भाग होते. चिंतेचे कारण समजल्यावर शामजी म्हणाला, ' पंडितजी, काही काळजी करू नका. तुमच्याऐवजी मी दरबारात जातो आणि पाहतो काय होते ते. '

पंडितजी घाबरले आणि म्हणाले, ' अरे, तू जाऊन तुझी आणि तुझ्याबरोबर माझी फजिती करून घेणार की काय ? अरे, ज्या प्रश्नांची उत्तरे मला नेमकी समजत नाहीत ती तू काय देणार ?'

शामजी म्हणाला, ' काय वाट्टेल ते होवो, पण तुमची विवंचना दूर झालीच पाहिजे. तुम्ही स्वस्थ बसा. मला फाशी जावे लागले तरी चालेल, पण तुम्ही स्वस्थ बसा. तुमची प्रकृती बरी नाही म्हणून पंडितजींनी मला पाठविलं आहे, असं सांगून मी निभावून नेतो. पाहू तर खरे काय होते ते ?'

शामजी धीट होता. हुशार होता. हजरजबाबी होता. पंडितजींच्या घरी होणाऱ्या धार्मिक चर्चेने त्याचे ज्ञानभांडार वाढले

होते. त्यात प्रत्यक्ष अनुभूतीचीही भर पडली होती.

ठराविक वेळी दरबारचे बोलावणे आले. पंडितजींच्याकडून चिठ्ठी घेऊन त्यांचेऐवजी शामजी दरबारात निघाला. शामजी बोलूनचालून नोकर, त्याचे कपडे ते काय असणार? त्यातल्या त्यात बरी स्वच्छ पण साधी शुभ्र वस्त्रे परिधान करून तो दरबारात गेला. राजाला लवून नमस्कार करून हाती चिठ्ठी देऊन म्हणाला,

' महाराज, पंडितजींची प्रकृती बरी नाही, त्यांनी मला पाठविले आहे. ते म्हणाले, एवढ्या साध्या प्रश्नांची उत्तरे द्यायला तू गेलास तरी चालेल. मला येण्याची गरज नाही. महाराज, आता विचारा तुमचे प्रश्न आणि ऐका माझी उत्तरे. '

पण महाराज आपल्या धार्मिक प्रथेप्रमाणे जो प्रश्न विचारतो तो शिष्य आणि उत्तरे देतो तो गुरू. मग या प्रसंगी मला उच्चस्थान देऊन आपणाला खाली बसावे लागेल, शिवाय गुरूंचा मान राखण्यासाठी त्यांच्यापुढे आदराने हात जोडून मस्तक नमविले पाहिजे.'

राजाने त्याला उंची वस्त्रालंकार देऊन आपल्या सिंहासनावर बसविले आणि आपण हात जोडून खालचे स्थान स्वीकारले. पण हे सर्व करताना बजावले, ' हे पाहा, माझ्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत तर फाशीची शिक्षा होईल, प्राणास मुकावे लागेल. '

शामजीने हसून उत्तर दिले, ' महाराज, यात काय संशय. अलबत, आपण योजलेली शिक्षा द्या, प्रश्न विचारा. आता विलंब नको.'

पहिला प्रश्न, ' परमेश्वर बसतो कुठे ?' सरळ सांगून पटणार नाही म्हणन शामजीने एक युक्ती योजली. तो म्हणाला, प्रश्नाचे

उत्तर सोपे साधे आहे. ‘ प्रथम एक गाय आणा.’ गाय आणली तेव्हा शामजीने विचारले, ‘ गाईचे दूध कुठं आहे ? ’
‘ गाईचे दूध तिच्या आंचळात आहे. राजाने उत्तर दिले.

‘ चूक चूक ’ शामजी म्हणाला, ‘ दूध गाईच्या सर्व अंगात आहे, ते आचळात उतरते ते रवंथ केल्यावर. बरं तर ही गाय आता जाऊ दे. आता थोडं दूध आणा.’ दूध आणल्यावर शामजीने विचारले, ‘ लोणी कुठंसं आहे ? ’ राजाने उत्तर दिले, ‘ दुधातच लोणी आहे, पण ते निराळे दिसत नाही. ’

शामजीने समजावले, ‘ दुधात लोणी दिसत नसताना त्यातच लोणी आहे यावर तू विश्वास ठेवतोस ना. मग जगात परमेश्वर सर्वत्र भरला आहे, चराचर व्यापून राहिला आहे. लोणी काढायचे तर दूध घुसळून काढावे लागते तसे परमेश्वराचे दर्शन हवे असेल तर अंतःकरण घुसळावे लागते. ’

राजाला पटले. मग दुसरा प्रश्न विचारण्यात आला. ‘ परमेश्वर कोणत्या दिशेने पाहतो. ’

शामजीने या प्रश्नाचे उत्तर पटवण्यापूर्वी एक मेणबत्ती आणवली व ती पेटवली आणि विचारले, ‘ या मेणबत्तीचा प्रकाश कोणत्या दिशेला पसरला आहे ते सांगा. पूर्वेला की पश्चिमेला, उत्तरेला की दक्षिणेला पसरला आहे ते सांगा.’ राजा म्हणाला, ‘ कोणत्या दिशेला म्हणजे सर्व दिशेलाच पसरला आहे. ’

शामजी म्हणाला, ‘तसाच परमेश्वर सर्व दिशेला पाहात असतो.’

राजाला उत्तर पटले.

आता तिसरा प्रश्न, ‘ ईश्वर काय करतो ? ’

शामजी म्हणाला ‘ठीक’ या प्रश्नाचे उत्तर आता देतो. हे पाहा पंडितजींना बोलावून घ्या. त्यांना सांगा आताच्या आता निघा. ’

पंडितजी घाबरले होते. पण करतात काय! धास्ती वाटत होती की, शामजीने घोटाळा करून ठेवला असेल व आता त्याच्याबरोबर माझीही गच्छन्ती! पंडितजी दरबारात आले. आत भीत भीत प्रवेश करून पाहतात तो सिंहासनावर शामजी बसलेला, त्याच्यापुढे प्रत्यक्ष राजेसाहेब खालच्या आसनावर हात जोडून बसलेले!

आपण स्वप्नात तर नाही. पंडितजींनी अंगाला चिमटा घेतला, डोळे ताणले तरी तेच दृश्य.

शामजीने पंडितजींना फर्मावले,

'पंडितजी, शिपायाच्या जागेवर जाऊन बसा. राजेसाहेब तुम्ही प्रधानजींच्या जागेवर जाऊन बसा. उठा पाहू? राजाज्ञा आहे. मी सिंहासनावर बसून राजदंड हाती घेऊन फर्मावितो आहे. समजले की नाही?'

बिचारे पंडितजी शिपायाच्या जागेवर राजेसाहेब प्रधानाचे जागेवर आणि शामजी राजाच्या सिंहासनावर राजदंड घेऊन बसले.

शामजींनी धीरगंभीर वाणीने उत्तर दिले, पाहिलेत ईश्वरी इच्छेने असे सर्व जग बदलत असते. ईश्वर करू शकणार नाही अशी एकही शक्ती नाही. तो राजाला रंक–रंकाला राव असे बदल सतत घडवीत असतो. त्याला अशक्य काहीच नाही. आताच पाहिलेत ना त्याचे प्रत्यंतर.'

शामजीने दिलेली उत्तरे राजाला पटली. संकट टळले शामजीला प्रधानमंडळात जागा मिळाली हे सांगणे नकोच.

★ ★

## ८. मला शिक्षा का नाही केलीत ?

हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेचे नमुनेदार वसतिगृह व त्याचे चालक श्री. अनंतराव हे मराठवाड्यात सुप्रसिद्ध होते. त्या वसतिगृहात ठिकठिकाणची मुले श्रीमंत, गरीब–सर्व थरांतील एका कुटुंबातील मुलाप्रमाणे राहात होती, शिकत होती. अनंतराव मुलाची माता झाले होते. आई आपल्या मुलासाठी खस्ता काढते, स्वतः उपाशी राहते, पण मुलांची आबाळ होऊ देत नाही. तसेच अनंतराव व त्यांचे बंधू व्यंकटराव हे मुलांसाठी लागेल ते करीत मुलांची मने फुलविण्यात, त्यांना रमविण्यात त्यांचा सर्वोत्कृष्ट आनंद सामावलेला असे. मुलांच्या हृदयातील गोपालकृष्ण त्यांना दिसे.

मुलांच्या खोल्यांतून ते फिरत. मुले बाहेर खेळायला गेली की, खोल्यातील साठलेला केर काढीत. कंदिलाच्या काचा पुशीत, तेल भरून ठेवीत, त्यांची पुस्तके, वह्या व्यवस्थित लावून ठेवीत.

मुलांनी एकमेकांवर प्रेम करावे, मदत करावी, शिस्त, स्वच्छता टापटीप वक्तशीरपणा, सचोटी हे गुण त्यांच्या अंगी बाणावे म्हणून गुरुजी अनंतराव अनंत प्रकारे झटत.

मुलांना संगत चांगली असावी हे खरे, पण काही श्रीमंत मुले वाटेल तशी वागत. गरीब मुलांना चिडवत. त्यांच्या खोड्या काढीत. चटकदार खाण्यापिण्यासाठी पैसे खर्च करीत. एकदा एका श्रीमंताच्या मुलाने– मल्लाप्पा चौधरीने– एक रुपया चोरला व चैन केली. चोरीचा गवगवा झाला, पण चोर कोण हे उघडकीस आले नाही. अनंतरावांनी प्रत्येक मुलाला विचारले, पण कोणी कबूल होईना. माझ्या वसतिगृहात चोरी व्हावी ही गोष्ट गुरुजींच्या मनाला लागून राहिली. कोणी चौधरीबद्दल शंका घेतली म्हणून त्यांनी त्याला बोलावून विचारले, ‘ चौधरी तुला रुपया कोणी घेतला हे ठाऊक आहे का ?– तू तर चांगल्या श्रीमंत घराण्यातला मुलगा. तू तर घेणे शक्य नाही याची मला खात्री आहे. पण तुझ्या कोणी मित्राने चोरी केली असेल तर मात्र लपवून ठेवू नको. ’

चौधरीने कानावर हात ठेवले. ‘ मला काही माहीत नाही. ’ असे उत्तर देऊन तो निसटला. गुरुजींना वाईट वाटले.

दुसऱ्या दिवशी बोर्डावर नोटीस लागली होती, ‘ गुरुजी अनंतराव हे उपास करणार आहेत. ’ वसतिगृहातील मुले हादरून गेली. ‘ कशासाठी ? ’ काही मुले हळहळली. चौधरीचे मन त्याचे त्याला खात होते. तो मनात विचार करू लागला, ‘ माझ्यासाठी तर नसेल ना ? ’ रात्रभर चौधरीला झोप आली नाही. ‘ उद्या उठल्या-बरोबर गुरुजींच्या पाया पडून चोरी केल्याची कबुली द्यायची. ’ असा निश्चय करून तो सकाळ होण्याची वाट पाहू लागला, सकाळ होताच गुरुजींना गाठून तो म्हणाला, ‘ गुरुजी, माझ्या

हातून चोरी झाली. मला क्षमा करा,' हा मी चोरलेला रुपया. आता मला शिक्षा करा. मला पश्चात्ताप होतो. मी पुन्हा असे करणार नाही. उपास सोडा.'

अनंतरावांनी त्याला पोटाशी घेतले. पाठीवरून प्रेमाने हात फिरविला आणि म्हणाले, 'पोरा, आज माझी अब्रू राखलीस. जा पुन्हा असे करू नको. चौधरींच्या घराण्याचा कुलदीपक तू.'

चौधरी हलेना. तो विनवणी करू लागला, 'गुरुजी मी खोटे बोललो, चोरी केली, मला शिक्षा करा. शिक्षा करा– मी येथून हलणार नाही.'

गुरुजी गहिवरले. ते म्हणाले, 'मुला, तुला शिक्षा झाली आहे. पश्चात्ताप झाला हीच तुला शिक्षा. जा आता.' तो म्हणू लागला, 'छे, छे, मला शिक्षा झालीच पाहिजे.' चौधरी खोलीवर गेला. त्याने सुरी घेतली आणि आपली करंगळी छाटली! एक पेरे तुटून पडले. रक्त भळभळा वाहू लागले. पण त्याने मन घट्ट केले होते. ही हकीगत वसतिगृहात सर्वत्र पसरली. मुले घाबरली. गुरुजींना ही वार्ता कळताच ते खोलीवर आले. रक्ताची धार लागली होती. त्यांना हे दृश्य पाहवेना. चौधरीच्या करंगळीवर उपचार करून त्याला डॉक्टरकडे घेऊन गेले. जखम बरी झाली. चौधरी सुधारला पण त्याची तुटलेली करंगळी हे त्याचे भूषण ठरले. तो पुढे पुढारी झाला. समाजकार्यकर्ता म्हणून लोक त्याला ओळखत. प्रसंग येईल तेव्हा तो आवर्जून सांगतो, 'ही माझी तुटकी करंगळी हे मला हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेच्या वसतिगृहाने दिलेले पारितोषिक, गुरुजी अनंतरावांच्या कृपेने लाभलेले ! !

★ ★

म. सं. मं.
वा. क्र. ९५८६ दिनांक ३।५।८४